नगरसचिव
विषय क्र. ३९३ ते ४२८
दाखल वि.क्र. ४२९ ते ४९०
ठराव क्र. ३९३ ते ४९०

# पुणे महानगरपालिका

## स्थायी समिती

### कार्यपत्रिका क्रमांक १४, दिनांक १/०७/२०१४

### सभा क्रमांक१५, दिनांक १/०७/२०१४ चा वृत्तांत

स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १/०७/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता म.ज्योतिबा फुले सभागृहात (स्थायी समितीच्या सभागृहात) भरली होती.

सदर सभेस खालील मा.सभासद उपस्थित होते.

१. मा. कर्णे (गुरूजी) बापूराव गंगाराम – अध्यक्ष
२. मा. अलगुडे मुकारी आण्णा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | मा.सौ.आंदेकर राजश्री सुर्यकांत | १०. | मा.मुळीक योगेश तुकाराम |
| ४. | मा.सौ.ओरसे शारदा शंकर | ११. | मा.सौ.मोहोळ मोनिका मुरलीधर |
| ५. | मा.केमसे शंकर दत्तात्रय | १२. | मा. राणे अनिल बाबूराव |
| ६. | मा.ॲड.छाजेड अभय भाकचंद | १३. | मा.रासने हेमंत नारायण |
| ७. | मा.तुपे चेतन विठ्ठलराव | १४. | मा. सौ. लोणकर नंदा नारायण |
| ८. | मा. तुपेरे राहूल बापू | १५. | मा.सौ.व्यवहारे कमल ज्ञानराज |
| ९. | मा.धंगेकर रविंद्र हेमराज | १६. | मा.सुतार पृथ्वीराज शशिकांत |

खालील निमंत्रित इतर मा.सभासद निमंत्रणावरुन उपस्थित होते.

मा. मा. मा. मा.

लघुलेखक :–

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. विकास देशमुख , महापालिका आयुक्त | २६. | मा.श्रीनिवास बोनाला,अति.नगर अभियंता (प्रकल्प व वाहतूक नियोजन व जनेयो क्र.२) |
| २. | मा. ,अति.महा. आयुक्त (ज.) | २७. | मा.प्रशांत रणपिसे, मुख्य अग्निशामक अधिकारी |
| ३. | मा.ओमप्रकाश बकोरिया,अति. महा.आयुक्त (वि.) | २८. | मा.शिवाजी दौंडकर सल्लागार (कामगार) |
| ४. | मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ) | २९. | मा.सुनील केसरी, उपायुक्त (वि.का.१) |
| ५. | मा.आर.एन.जोशी, अध्यक्ष,.व्यव. संचालक,पीएमपीएमएल | ३०. | मा.ज्ञानेश्वर मोळक, उपायुक्त (वि.का.२) |
| ६. | मा.सुनिल पारखी, नगरसचिव | ३१. | मा.सुरेश जगताप, उपायुक्त (वि.का.३) |
| ७. | मा.हनुमंत नाझीरकर, प्र.संचालक(ना.वि.यो.) | ३२. | मा.मधुकांत गरड, उपायुक्त (वि.का.४) |
| ८. | मा.अंबरिष गालिंदे,सह आयुक्त (लेखापरिक्षक) | ३३. | मा.प्रमोद यादव, उपायुक्त (वि.का. घनकचरा व्यवस्थापन) |
| ९. | मा. हेमंत निकम,(कआ. व क.सं. प्रमुख) | ३४. | मा.आर.टी.शिंदे, उप आयुक्त (भु.जि.) |
| १०. | मा.अनिल पवार, उपायुक्त (विशेष) | ३५. | मा.प्रमोद निरभवणे, अति.नगर अभियंता (पथ) |
| ११. | मा.मोरे दगा पितांबर, उपायुक्त (ग.व.नि.) | ३६. | मा.श्रीनिवास कंदूल, (कोठी प्रमुख) |
| १२. | मा. उपायुक्त (जिं.घ.) | ३७. | मा.श्रीकृष्ण चौधरी, कार्यकारी अभियंता (विद्युत) |
| १३. | मा.मंगेश जोशी, उपायुक्त (जनरल)(सेवकवर्ग) | ३८. | मा.ना.न.बारापात्रे, (विकास अभियंता, पथ) |
| १४. | मा.सुनिल केसरी, उपायुक्त (तांत्रिक) | ३९. | मा.संदीप खांदवे, कार्यकारी अभियंता(भवन) |
| १५. | मा.डॉ.एस.टी.परदेशी, प्र.आरोग्यप्रमुख | ४०. | मा.विजय कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (ड्रेनेज व पा.पु.प्रकल्प) |
| १६. | मा.सौ.उल्का कळस्कर, मुख्य लेखापाल | ४१. | मा.मदन आढारी, अधीक्षक अभियंता |
| १७. | मा. विलास कानडे, आयातकर प्रमुख | ४२. | मा.अब्बास पटेल, अधीक्षक अभियंता |
| १८. | मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता | ४३. | मा.संजय मोरे, जनता संपर्क अधिकारी |
| १९. | मा.विवेक खरवडकर,अति.नगर अभियंता | ४४. | मा.सुधाकर देशमुख, विशेष कार्या (दक्षता) (सांख्यिकी व संगणक) |
| २०. | मा. सौ.मिनाक्षी राऊत्त, शिक्षणाधिकारी, माध्य.व तां.शि. | ४५. | मा.किशोर पोळ, कार्यकारी अभियंता (व्हे.डेपो) |
| २१. | मा.शिवाजी दौंडकर, प्र.शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ | ४६. | मा. माधव जगताप, सहा. आयुक्त, घोले रोड |
| २२. | मा.ॲड.मंजूषा इधाटे, प्र.विधी सल्लागार | ४७. | |
| २३. | मा.रमेश शेलार, मुख्य सुरक्षाअधिकारी | ४८. | |
| २४. | मा.अशोक घोरपडे, सहा. उद्यान अधिक्षक | ४९. | |
| २५. | मा.मंगेश जोशी, उपायुक्त (समाजकल्याण) | ५०. | |

प्रथम सभा क्र. , दि. / /२० ते सभा क्र. , दि. / /२० चे वृत्तांत कायम करावेत असे सर्वानुमते ठरले व त्यानंतर मा.अध्यक्ष यांनी त्यावर स्वाक्षऱ्या केल्या. पुरेश्या गणसंख्येअभावी सभेचे कामकाज झाले नाही.

सोबतची तहकुबी घेणे.

# पुणे महानगरपालिका
## स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक १४, दिनांक १/०७/२०१४
## सभा क्रमांक १६, दिनांक १/०७/२०१४ चा वृत्तांत

मा.अध्यक्ष – सभा सुरू करावी.

मा. नगरसचिव – सभेला सुरूवात करण्यात येत आहे.

मा.हेमंत रासने–मा.अध्यक्ष, मागील सभेमध्ये जी माहिती मागविण्यात आली होती. ती माहिती घ्यावी, कारण पुढील आठवड्यामध्ये माहिती देतो असे सांगतात आणि नंतर ती माहिती मिळतच नाही.

मा.शंकर केमसे–कार्यपत्रिकेवरील एक विषय शिल्लक ठेवून मग माहितीचे विषय घ्यावेत.

मा.हेमंत रासने–मी मागील सभेमध्ये आपण कामगार उपकल्याण कर कधीपासून गोळा करीत आहोत? या संदर्भात माहिती विचारली होती.

मा.अध्यक्ष–सदरची माहिती फाईलमध्ये जोडून देण्यात आली आहे. आपण मनपाच्या हिताची माहिती विचारत आहात, ही चांगली गोष्ट आहे. सदर माहितीचा अभ्यास करावा व पुन्हा नंतर यावर चर्चा करावी.

मा.शंकर केमसे–मा.अध्यक्ष, मागील सभेमध्ये सराफ व्यापाऱ्यांकडील हिरे, माणिक, मोती आणि त्यावरील एल.बी.टी.याबाबतची माहिती द्यावयाची शिल्लक आहे.

मा.कानडे,सह.आयुक्त तथा,(एल.बी.टी.प्रमुख)–याबाबत मागील सभेमध्ये चर्चा करण्यात आली होती आणि आपल्याकडे ३० तारखेला रिर्टन्स येणार आहेत तरी ही माहिती दि.१५ जुलै पर्यंत सदरची माहिती मिळू शकेल असे मी त्यावेळी सांगितले होते.

मा.ॲड.अभय छाजेड–विषय घ्यावेत.

मा.मुकारी आलगुडे–मा.अध्यक्ष, एक विषय शिल्लक ठेवून मग चर्चा करावी.

मा.हेमंत रासने–माझा दुसरा एक विषय असा होता की, व्हॅटकर कधी पासून सुरू केला? आणि आकारणीच्या वेळी असे काही ठरले होते का? की त्यानंतर जकात रद्द व्हावी.

मा.अध्यक्ष–याबाबत राज्य सरकारकडून माहिती घ्यावी.

मा.हेमंत रासने–आपण केंद्र व राज्य शासनाला अनेकवेळा पत्र पाठवितो, मग लोकप्रतिनिधीसाठी माहिती घेण्यास कोणती अडचण आहे?

मा.शंकर केमसे–मा.अध्यक्ष, मला एक माहिती मिळाली आहे की, आपल्याकडील मा.पोळ, कार्य.अभि.(व्हे.डेपो) त्यांची बदली होऊ शकत नाही. हे पद वेगळे आहे का? ते पद तांत्रिक स्वरूपाचे आहे का?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–मा.अध्यक्ष, महानगरपालिकेकडे काही पदे किंवा काही विभाग असे आहेत की, त्यामध्ये एकवट पदे आहेत आपण त्यांची भरती करतो. जसे की आता मा.कार्यकारी अभियंता ,व्हेईकल डेपो आणि उदाहरणार्थ सी.एफ.ओ., अग्निशामक दल, या पदावरील अधिकाऱ्यांची दुसऱ्या ठिकाणी बदली होऊ शकत नाही, अशा प्रकारचे ते पद आहे. आपल्याकडे इतर इंजिनिअरींग किंवा क्लेरिकल डिपार्टमेंट मध्ये जी जनरल पदे आहेत. आपण त्यांच्या बदल्या एका विभागामधून दुसऱ्या विभागामध्ये करीत असतो. हे विशिष्ठ पद आहे स्पेशल क्वॉलिफिकेशनच्या दृष्टीने हे पद आहे.

मा.शंकर केमसे–माझे असे मत आहे की, असे असल्यामुळे आणि तुम्ही जर एकाच ठिकाणी २५ वर्षे काम करीत असाल तर तुम्ही राजे व्हाल! हे राजे होणे, चांगले आहे का? आपण जर त्या विभागाची माहिती घेतली तर आपल्या लक्षात येईल की, या विभागाबाबत अनेक तक्रारी झालेल्या आहेत. आपण याबाबत विचार केला आहे का? त्यांच्यावर कारवाई करू नये, असे काही आहे का? यावर उपाययोजना झाली पाहिजे. तुमच्या म्हणण्याप्रमाणे हे अधिकारी तिथे २५ वर्षापासून आहेत. आपण जर एकाच ठिकाणी २५ वर्षे काम करीत असाल तर हे कसे काय होणार? यावर काही उपाय नाहीत का?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–त्या विभागात मा.पोळसाहेब काम करतात परंतु त्यांच्या नियंत्रणाखालील विभागात वेगवेगळे लोक काम करतात आणि त्यांच्या या विभागाकडे जर काही तक्रारी असतील तर.

मा.शंकर केमसे–१०० टक्के तक्रारी आहेत.

मा.पृथ्वीराज सुतार–आपण आता वेगळी शैक्षणिक पात्रता असे सांगितले आहे. ही वेगळी शैक्षणिक पात्रता म्हणजे काय?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–या पदासाठी मॅकेनिकल इंजिनिअर आणि अनुभव अशी पात्रता होती.

मा.पृथ्वीराज सुतार–आपल्याकडे मॅकेनिकल इंजिनिअरची एकच जागा आहे का?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–हो.

मा.शंकर केमसे–व्हेईकल डेपोकडे तांत्रिक ज्ञान, माहिती असल्यामुळे आपण व्हेईकल डेपोच्या माध्यमातून फायर बिग्रेडची गाडी घेतली होती तसेच रस्ते साफसफाई करण्यासाठी गाडया खरेदी करण्यात आल्या होत्या. खरे पाहता ही दु:खाची बातमी आहे परंतु ती आपणास सांगायला आनंद वाटतो की, आपण जी नवीन फायर ब्रिगेडची गाडी मागविली होती ती आणतानाच नादुरूस्त झाली होती. तसेच आपण साफसफाईसाठी ज्या मशीन्स मागविल्या आहेत. त्या मशीन्स आजपर्यत एकदा सुध्दा वापरल्या गेल्या नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. जर त्यांच्या नियंत्रणाखाली असे कामकाज होत असेल तर, त्यांना तेथेच नियुक्ती दिली पाहिजे का? आपण हे कशासाठी करीत आहोत?

मा.पृथ्वीराज सुतार–मागील महिन्यामध्ये आपण त्यांना बढती देणार होतो.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–एक नवीन पद करावयाचे आहे.

मा.पृथ्वीराज सुतार–सदरचे पद लवकर तयार करावे, आणि यामध्ये त्यांची माहिती घेतली आहे का?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–हो, घेतली आहे.

मा.शंकर केमसे–एकाच ठिकाणी इतकी वर्षे नियुक्ती देणे, असे काही करू नका. आता मी ज्या गाड्याबद्दल सांगितले त्या गाड्या बंद आहेत. अशा प्रकारच्या हजारो भानगडी आहेत. आपण या भानगडीकडे दुर्लक्ष करीत आहोत आणि यामुळे त्यांना एक प्रकारचे वरदान मिळाल्यासारखे झाले आहे की, त्यांची कोणीही बदली करू शकत नाही व म्हणूनच या सर्व भानगडी झाल्या आहेत. माझी प्रशासनाला विनंती आहे की, मा.अध्यक्ष, या मुद्दयाबाबत ८ दिवसांमध्ये निर्णय झाला पाहिजे. अन्यथा आम्हाला या सर्व भानगडी प्रशासनासमोर आणाव्या लागतील. त्यांना वेगळया पध्दतीने पदच्युत करण्याची वेळ येऊ नये. त्यामुळे प्रशासनाने ही कार्यवाही करावी, अन्यथा आम्ही जर ही कार्यवाही केली तर यामध्ये अनेक प्रॉब्लेम्स होतील. या एक आठवड्याच्या आतमध्ये त्यांची बदली दुसऱ्या ठिकाणी करावी. महानगरपालिकेमध्ये बुध्दीवंत अधिकाऱ्यांची कमतरता आहे का?आपल्याकडे अनेक अधिकारी आहेत, त्यांना या ठिकाणी काम करू द्यावे.

मा.अध्यक्ष– पुणे शहराची लोकसंख्या पाहता, महानगरपालिकेमध्ये अधिकाऱ्यांची संख्या पाहता, शक्यतो सिमीलर पोस्ट ठेवू नयेत. आपल्याकडे पूर्वी एकच मा.अति.आयुक्त होते. त्यानंतर मा.अति.आयुक्त यांची दोन पदे केली. त्याप्रमाणे ज्या ज्या सिमिलर पोस्ट आहेत त्यामध्ये वाढ करावी जेणेकरून आपल्याला त्यांना आल्टरनेटीव्ह देता येईल. आता मा.सभासद ज्या पदाबद्दल सांगत आहेत, अशा अनेक ठिकाणी सिमीलर पोस्ट आहेत. त्याप्रमाणे प्रशासनाने शासनाकडे मागणी केली पाहिजे आणि या जागा दुप्पट केल्या पाहिजेत.

मा.पृथ्वीराज सुतार–जागा वाढविणे आवश्यकच आहे.

मा.शंकर केमसे–याबाबत जर तुम्ही कारवाई करणार नसाल, तर तुम्हाला जास्त वेळ वाट पहावी लागणार नाही. आम्ही आपणासमोर दोन दिवसामध्ये अशी कागदपत्रे सादर करू. परंतु यामुळे प्रशासनाला मान खाली घालण्याची वेळ येऊ नये. कारण यामध्ये अनेक प्रॉब्लेम आहेत. कोणती गाडी आणायची? त्याबाबत हेच ठरविणार का? मग हेच ठरविणार की, ही गाडी आपल्याकडे आली पाहिजे. मग त्याच पध्दतीने ते टेंडर होणार, असे कसे चालेल? महानगरपालिका कोणाच्याही मालकीची नाही. ही पुणेकरांची आहे. ही स्वायत्त संस्था आहे आणि येथे आपण विश्वस्त असून ते सेवक आहेत. आम्ही नगरसेवक, म्हणजे नगरपालिकेचे मालक किंवा नगर पिता नव्हे. ते दिवस गेले. आता हे बदल झाले पाहिजेत अन्यथा यामुळे आम्हाला व तुम्हालाही मान खाली घालावी लागेल. कारण ही विचार करण्याची गोष्ट आहे की, तुम्ही मशीन मागविता परंतु ते एकदाही वापरले जात नाही. तुम्ही फायर ब्रिगेडची गाडी मागविता परंतु ती येतानाच नादुरूस्त होते. तुम्ही या तांत्रिक बाबी कशा पध्दतीने हाताळत आहात? जर असे होत असेल तर त्यांची बदली करायला नको का?

मा.अध्यक्ष–प्रशासनाने याबाबत दक्षता घ्यावी.

मा.चेतन तुपे–मी मा.महा.आयुक्त आणि प्रशासनाचे कौतुक करतो की, काल राज्य सरकारकडे आपल्या हॉकर्स पॉलिसीचे सादरीकरण झाले. ही पॉलिसी इतकी चांगली होती की, राज्यसरकारने हा पॅटर्न संपूर्ण राज्यात राबवावा, असे सांगितले आहे. प्रशासनाने यावर खरोखरीच चांगले काम केले आहे. त्यामुळे मी मा.महा.आयुक्त आणि प्रशासनाचे अभिनंदन करतो.

## दाखल विषय

**दाखल विषय क्र.४२९**

मुख्य लेखापरीक्षक कार्यालयाकडील ज्युनिअर ग्रेड लेखनिक (पे बॅन्ड रु.५२०० ते २०२००+ ग्रेड पे रु.२९०० +मान्य भत्ते ) या संवर्गातून सिनिअर ग्रेड लेखनिक( पे बॅन्ड रु.५२०० ते २०२००+ ग्रेड पे रु.४१०० +मान्य भत्ते) या संवर्गात बढतीच्या पदावर नेमणूका करणेसाठी निवडसूचीतील शिफारस केलेल्या निवडसूचीतील बढतीच्या पदावरील नेमणूका करण्यासाठी सेवकांचा दिलेला क्रम, मागासवर्गीस अनुशेष व आरक्षण, शासनाकडील वेळोवेळीचे आदेश, रिक्त जागांची उपलब्धता इ. आस्थापनाविषयक बाबीचा विचार करुन मा.मुख्य लेखापरीक्षक यांना बढतीने नेमणूका करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ५३(२) नुसार मान्यता मिळणेबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांचे जा.क्र.मुलेप/१६७ दि. २६/६/२०१४ चे पत्र.

मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४३०**

पथ विभागाकडून कार्य.अभियंता क्र ३ वारजे कर्वेनगर कोथरुड उपविभागाअंतर्गत एम.एन.जी.एल./एम.एस.ई.डी.सी.एल./ बी.एस.एन.एल. इ. कंपन्यांनी पाईप केबल टाकणेकरीता खोदाई केलेल्या ठिकाणी रिईनस्टेटमेंट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सद्‌गुरु कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५९,९९,७८५/– पेक्षा १८.५७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४८,८५,६२४=९३ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१३३ दि. २६/६/२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–पथ विभागाकडून, कार्यकारी अभियंता क्र.३, वारजे कोथरूड उपविभागातंर्गत एम.एन.जी.एल., एम.एस.डी.एल., बी.एस.एन.एल. कंपन्यांनी पाईप केबल टाकण्याकरिता खोदाई केलेल्या ठिकाणी रिईन्स्टेंटमेंट करणे यासाठी ४८ लाखाचे टेंडर आहे.

मा.हेमंत रासने– या विषयाबाबतची माहिती द्यावी.

मा.शंकर केमसे–तुम्ही रिईन्स्टेंटमेंट कसे काय करता?

मा.हेमंत रासने– ही खोदाई कधी केली आहे?

मा.निरभवणे, अति.नगर अभियंता (पथ)–मा.अध्यक्ष, आपण सी.सी.टी.व्ही.खोदाईसाठी परवानगी दिली आहे. एम.एन.जी.एल., एम.एस.डी.एल., बी.एस.एन.एल. कंपन्यांनी खोदाई केली आहे म्हणून हे टेंडर आणले आहे.

मा.हेमंत रासने– ही खोदाई कधी केली आहे?

मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–खोदाई चालू आहे. ते आताही परवानगी मागत आहेत.

मा.हेमंत रासने–ही खोदाई कधी पासून चालू आहे?

मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–सी.सी.टीव्हीची खोदाई आता सुध्दा चालू आहे. ही खोदाई एक महिन्यापासून चालू आहे. त्यांनी वेगवेगळया ठिकाणची परवानगी मागितली आहे.

मा.हेमंत रासने–किती ठिकाणी खोदाई झाली आहे? व किती ठिकाणी खोदाईचे काम शिल्लक आहे?

मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–सदरची माहिती आता उपलब्ध नाही. परंतु काही ठिकाणी आपल्या विभागाकडून काही जागांवर पाणी पुरवठ्याच्या लाईन्स टाकण्यात आलेल्या आहेत.

मा.पृथ्वीराज सुतार–आपण सी.सी.टी.व्ही.खोदाईसाठी परवानगी दिली होती त्यावेळी या कामासाठी मुदत सुध्दा देण्यात आली होती. याबाबत माहिती द्यावी.

मा.हेमंत रासने–आपण खोदाईच्या कामावर केव्हापासून बंदी घातली आहे?

मा.महा.आयुक्त–आपण खोदाई कामावर दि. ३० एप्रिल पासूनच घातली आहे.

मा.हेमंत रासने–मग आता खोदाई चालू असल्याची माहिती देत आहेत.

मा.पृथ्वीराज सुतार–त्यानंतर पुन्हा त्यांनी परवानगी दिली आहे.

मा.महा.आयुक्त–सी.सी.टी.व्ही.च्या बाबतीमध्ये आपण नंतर परवानगी दिलेली आहे आणि त्यामध्ये मनपाचीही कामे होती.

मा.पृथ्वीराज सुतार–आपण आपल्या तातडीच्या कामासाठी ठीक आहे परंतु सी.सी.टी.व्ही.साठी तुम्ही आयत्यावेळी पत्रक काढून पुन्हा त्यांना परवानगी दिली आहे. याबाबत मुंबई मध्ये बैठक झाली, असे सांगण्यात आले होते. आपण ते तातडीच्या संदर्भामध्ये केले होते आणि यासाठी मुदत सुध्दा देण्यात आली होती. आता ही मुदत संपली आहे. आता कोणती खोदाई चालू आहे?

मा.महा.आयुक्त–आपण त्यांना २० तारखेपर्यंत मुदत दिली होती.

मा.पृथ्वीराज सुतार–आपण त्यांना दि.२० जून पर्यंत मुदत दिली होती. ही मुदत संपली आहे.

मा.महा.आयुक्त–नाही, आता जी पूर्वी खोदाई केली आहे. त्याचेच रिईन्स्टेंटमेंट करायचे आहे.

मा.पृथ्वीराज सुतार–परंतु आता काही ठिकाणी खोदाई चालू आहे.

मा.महा.आयुक्त–यामध्ये फक्त पिलर्स उभे करण्यासाठी रस्त्यामध्ये त्यांना जी वन बाय वन ची जागा आवश्यक असते त्यासाठी ही खोदाई चालू आहे आणि यासाठीची परवानगी देण्यात आली आहे.

मा.पृथ्वीराज सुतार–मध्यतंरी आम्ही पावसाळयाच्या पूर्वी करावयाच्या कामासाठी टेंडर मंजूर केले होते. त्यामधील कामे झाली आहेत का?

मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–सदर टेंडरमधील कामे झाली आहेत.

मा.पृथ्वीराज सुतार–ती कामे झालेली नाहीत.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त(इ)–एका वॉर्डामध्ये ३ ते ४ कोटी रू.चे काम झालेले आहे.

मा.पृथ्वीराज सुतार–आपण ज्या ठिकाणचे काम करण्यासाठी टेंडर मंजूर करून घेतले त्यामध्ये जे काही भाग असतील. त्यामध्ये पावसाळ्याच्या आधी रस्ते करणे हे काम सुध्दा होते. ही कामे झाली आहेत का?

मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–आपण रस्ते केले आहेत.

मा.पृथ्वीराज सुतार–सगळे रस्ते झाले आहेत का? संपूर्ण १० कोटी रू.खर्च झाले आहेत का?

मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–पूर्ण खर्च झालेला नाही.

मा.पृथ्वीराज सुतार–तो संपूर्ण खर्च का झाला नाही?

मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–ते टेंडर पावसाळयासाठी सुध्दा आहे.. त्यातील संपूर्ण १० कोटी रू.खर्च होणार नाहीत.

मा.पृथ्वीराज सुतार–नाही, आपण आमच्याकडून पावसाळ्याच्या आधी करावयाची कामे यासाठी मंजूर करून घेतले आहे. तो निधी खर्च झाला का? हा निधी का खर्च झाला नाही? याबाबत माहिती द्यावी.

मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)– रिसर्फेसिंगची कामे ६५ टक्क्यापर्यंत पूर्ण झालेली आहेत आणि यामधील १० कोटी रू.ची रक्कम खर्च होणार नाही.

मा.पृथ्वीराज सुतार–मग आमच्याकडून १० कोटीचा निधी का घेण्यात आला आहे?

मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–हे टेंडर पूर्ण वर्षभरासाठी आहे.

मा.पृथ्वीराज सुतार– हे दोन विषय वेगळे आहे. रस्त्यातील खड्डयांसाठी वेगळे टेंडर झाले आहे.

मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–नाही, साहेब ते एकत्र आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–रस्त्याच्या खड्डयांसाठी वेगळे टेंडर आहे आणि पावसाळयाच्या आधी रस्ते करणे यासाठी सुध्दा वेगळे टेंडर झाले आहे.
मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–नाही, मा.अध्यक्ष, त्यामध्ये रस्त्याचे.
मा.पृथ्वीराज सुतार–तुम्ही आम्हाला मागील टेंडर दाखवावे, त्याचा अहवाल द्यावा.
मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–त्यामध्ये कोणकोणती कामे झाली आहेत? त्याची माहिती देतो.
मा.पृथ्वीराज सुतार–आपण पावसाळयाच्या आधीच्या कामासाठी निधी घेतला आहे व तो हेड सुध्दा तसाच आहे.
मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–त्यामध्ये रिसर्फेसिंगची कामे केली आहेत.
मा.पृथ्वीराज सुतार–त्या कामांची माहिती द्यावी.
मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–मी या कामाची यादी उपलब्ध करून देतो.
मा.पृथ्वीराज सुतार–१० कोटी रूपयांचा निधी घेतला आहे आणि तो निधी का खर्च झाला नाही? याबाबतची माहिती द्यावी.
मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–१० कोटी रूपये खर्च होणार नाहीत.
मा.पृथ्वीराज सुतार–मा.अध्यक्ष, हे चुकीची माहिती देत आहेत.
मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–मा.अध्यक्ष, यामध्ये पावसाळ्याच्या आधीचे सुध्दा आहे आणि इतर सुध्दा आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–तुम्ही आता ही माहिती मागवावी.
मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–ती माहिती उपलब्ध करून देतो.
मा.योगेश मुळीक–मा.अध्यक्ष, यामध्ये जी कामे राहिली आहेत, त्याची सुध्दा माहिती द्यावी.
मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–यामध्ये ४ टेंडर होते, त्या चारही टेंडरची माहिती देतो.
मा.पृथ्वीराज सुतार–यामध्ये दोन वेगवेगळे विषय आहेत. आपण रस्ते दुरूस्ती, खड्डे बुजविणे यासाठी टेंडर काढले आहे. पावसाळयाच्या आधी खड्डे दुरूस्ती किंवा रिपेअरिंग हा वेगळा विषय आहे.
मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त(इ)– त्या व्यतिरिक्त खड्डयांसाठी वेगळे असेल.
मा.पृथ्वीराज सुतार– ते रस्ते करण्यासाठी आहे.
मा.राहुल तुपेरे–पु.ल.देशपांडे उद्यानच्या शेजारी एम.एन.जी.एल.कंपनीने खोदाई करून तेथे आडवे पत्रे लावले आहेत. हा खड्डा खूप मोठा आहे. सदरचा खड्डा अद्याप बुजविलेला नाही. ते काम अर्धवट का ठेवले आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–जे.एन.एन.यु.आर.एम. हे महत्वाचे खाते आहे. या खात्याकडे मुख्य अधिकारी कोण आहेत? सध्या संबंधीत अधिकारी रजेवर आहेत, हा मुद्दा नाही. मा.बारापात्रे यांचे डेव्हलपमेंट इजिनिअर असे पद आहे. येथे अधिकारी नसल्यामुळे कामे होत नाहीत. मा.बारापात्रे हे डेव्हलपमेंट इजिनिअर आहेत, त्यांच्या खालोखाल कोणते अधिकारी आहेत?
मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त(इ)–डी.वाय.सी.आहेत.
मा.पृथ्वीराज सुतार–तेथे डी.वाय.सी.नाहीत आणि आमच्याकडे जे सहा.अभियंता दिले होते त्यांची सुध्दा बदली केली आहे आणि त्याऐवजी बदली अधिकारी दिलेले नाहीत. आमची सर्व कामे पेन्डिंग आहेत. आम्ही आमच्या तक्रारी कोणाला सांगणार? तसेच कामांवर व्हिजीट करण्यासाठी किंवा निर्णय घेण्यासाठी अधिकारी नाहीत. आमच्या भागामध्ये तातडीने एक अधिकारी द्यावेत.
मा.हेमंत रासने–आता जी खोदाई चालू आहे ती केव्हापासून चालू झाली आहे?
मा.ॲड.अभय छाजेड–आता रिईन्स्टेंटमेंटसाठी १० कोटी रू. आहेत आणि पुन्हा हे रिईन्स्टेंटमेंट का आणले आहे?
मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–सर, ते वेगळे आहे आणि ड्रेनेज लाईन, इतर कामासाठी खूप मोठया प्रमाणात खोदाई झालेली आहे. केबल,सी.सी.टी.व्ही.ची खोदाई झाली आहे. पावसाळ्यापूर्वी आणि पावसाळयानंतर जी कामे करावी लागणार आहेत, त्यासाठी १० कोटी रू.चे टेंडर आहे.
मा.ॲड.अभय छाजेड–पावसाळयानंतरची कामे सुध्दा त्यामध्येच आहेत.
मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–खड्डे बुजविणे इ.कामे आहेत. मुख्य म्हणजे पावसाळयापूर्वी जे खराब होणारे रस्ते आहेत, त्यावर रिसर्फेसिंग आणि पावसाळ्यातील इतर कामे असे आहे. मी आपणास चारही टेंडरची माहिती देतो.
मा.महा.आयुक्त–त्याचे म्हणणे असे आहे की, ही खोदाई कधी केली आहे? माहे जानेवारीपासून जी खोदाई केली आहे किंवा माहे एप्रिल पर्यंत सी.सी.टी.व्ही वगळून जी खोदाई किंवा सरकारी कामासाठीची खोदाई वगळून किंवा एम.एन.जी.एल.ची जी थोडीफार खोदाई असेल, त्याचे रिईन्स्टेंटमेंट करायचे आहे का?
मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–होय.
मा.महा.आयुक्त–मा.सभासदांना तीच माहिती हवी आहे.
मा.निरभवणे,अति.नगर अभियंता (पथ)–मी त्या भागांची माहिती देतो.
मा.हेमंत रासने–तुम्ही ती माहिती द्यावी परंतु माझ्या बोलण्याचा उद्देश असा आहे की, आपण जेव्हा खोदाई सुरू करतो, त्याचवेळी ही टेंडर्स सुध्दा लावली पाहिजेत. खोदाई झाल्यानंतर लगेच तो रस्ता बुजविला पाहिजे. आता मा.राहूल तुपेरे यांनी जो विषय मांडला आहे की, महिनोमहिन्यांपूर्वी खोदाई झालेली असते आणि ते तसेच राहते. ही प्रक्रिया त्याचवेळी केली पाहिजे.
मा.पृथ्वीराज सुतार–आमचे सुध्दा तेच म्हणणे आहे. ज्यावेळी तुम्ही खोदाईचे काम घेता त्याचवेळी १० ते २० टक्के रिईन्सटेंटमेंटसाठी केले पाहिजेत.आपण जर पाण्याची लाईन टाकणे हे काम ठरविले असेल तर त्यामध्ये १० ते २० टक्के दुरूस्तीची रक्कम सुध्दा समाविष्ट केली पाहिजे.

मा.ॲड.अभय छाजेड–अगोदर त्याच पध्दतीने कामकाज होत होते नंतर यांनी बदलले आहे. जो ठेकेदार काम घेत असे, त्याच ठेकेदाराकडून हे काम केले जात होते.
मा.पृथ्वीराज सुतार–ड्रेनेज किंवा खोदाईचे काम असेल तर ही रक्कम त्यामध्येच समाविष्ट करावी.
मा.हेमंत रासने–हा खूप मोठी बाब आहे. परंतु असे अनेक छोटे छोटे विषय आहेत.
मा.अध्यक्ष–आम्ही आमच्या प्रभागामध्ये अशाच पध्दतीने काम करून घेऊ.
मा.हेमंत रासने– काही कामे छोटी असतात त्यासाठी ते खोदाई करतात संबंधित कामातील दुरूस्ती होते आणि वर्षेनुवर्षे तो रस्ता तसाच राहतो.
मा.ॲड.अभय छाजेड–प्रभागामध्ये जर बी.एस.एन.एल.ने परस्पर खोदाई केली असेल तर आपण चार्जेस घेतो. ते रिईन्स्टेंटमेंट कशाला करतील?
मा.महा.आयुक्त–आपल्या टेंडरच्या बाबतीत करावे लागेल.
मा.हेमंत रासने–परंतु आपणच खोदाईची परवानगी देतो.
मा.महा.आयुक्त–इतर कंपन्यांचे जे रिईन्स्टेंटमेंट काम आहे त्यामध्येच आपली रिईन्स्टेंमेंट्वी कामे त्यामध्ये करावीत असे मा.सभासदाचे म्हणणे आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–ही कामे पथ विभागाकडून करून घ्यावीत, असे आमचे म्हणणे नाही दोन वेगवेगळया खात्यामध्ये कम्युनिकेशन नसल्यामुळे ही कामे प्रलंबित राहतात. त्यांच्याकडे बजेट असते परंतु जर त्यांच्याकडे बजेट नसेल तर ते ही कामे करू शकणार नाहीत.
मा.हेमंत रासने–काही वॉर्डात छोटी छोटी कामे असतात. समजा एखाद्या ठिकाणी ड्रेनेजचे चेंबर खराब झाले तर ड्रेनेजचे लोक येऊन खोदाई व दुरूस्ती करतात परंतु त्यानंतर रिईन्स्टेंटमेंट होत नाही.
मा.पृथ्वीराज सुतार–त्यानंतर हा रस्ता १० फूटी आहे की, २० फूटी आहे? काही रस्त्यावरील कामे क्षेत्रिय कार्यालयाच्या अंतर्गत येतात, तर काही रस्ते मुख्य कार्यालयाच्या अखत्यारित आहेत. त्यामुळे ही कामे कोणी करावीत? यामुळे ही कामे प्रलंबित राहतात. त्यामुळे कामे छोटी असोत किंवा मोठी असोत, याचा इस्टीमेंट रक्कमेमध्ये उल्लेख करूनच ही टेंडर काढावयास लावावीत.
मा.महा.आयुक्त– रिईन्स्टेंटमेंट पथ विभागाने करावे.
मा.पृथ्वीराज सुतार–पथ विभागाने रिईन्स्टेंटमेंट करू नये ही कामे संबंधीत ठेकेदारच करेल.
मा.अध्यक्ष–यामध्ये जी खोदाई कामे आहेत. त्या खोदाईच्या कामाचे इस्टीमेट करताना त्याठिकाणी रिईन्स्टेंटमेंट झाले पाहिजे अशा प्रकारचे ॲटम ठेवून ते टेंडर काढले पाहिजे. त्यामुळे हे पेन्डींग राहणार नाही. सदरचे काम सुध्दा पूर्ण होईल आणि लगेच रिसर्फेसिंग होऊन जाईल.
मा.ॲड.अभय छाजेड–आपण पूर्वी याच पध्दतीने काम करीत होतो. ते बंद का केले ? याची माहिती नाही.
मा.अध्यक्ष–समजा, जर पाण्याची लाईन टाकणे, ड्रेनेज लाईन दुरूस्त करणे या कामाच्या इस्टीमेंटमध्येच रिईन्स्टीमेंटच्या कामाचा समावेश केला पाहिजे.
मा.ॲड.अभय छाजेड–यामध्ये तांत्रिकदृष्टया काही अडचण आहे का?
मा.महा.आयुक्त– इस्टीमेंट मध्येच असल्यामुळे ही ठेकेदाराची जबाबदारी राहील. ड्रेनेज विभागाकडून बरीच खोदाई होत असते, याबाबत ड्रेनेज विभागाचे मत काय आहे?
मा.बेलदार,कार्य.अभि.(ड्रेनेज)–प्रत्येक ठेकेदाराकडे रिईन्स्टेंटमेंटची मशनरी नसते. त्यामुळे ते ही कामे करीत नाहीत.
मा.मुकारी अलगुडे–प्रत्येक ठेकेदार ही कामे करू शकतात.
मा.पृथ्वीराज सुतार–हा ठेकेदाराचा प्रश्न आहे आणि त्यांच्याकडून काम करून घेण्याची आपली जबाबदारी नाही का?
मा.ॲड.अभय छाजेड–आपण जर एखाद्या ठेकेदाराला काम दिल्यानंतर त्यास १० सब कॉन्ट्रक्टर नेमण्याची परवानगी देण्यात येते आणि जर त्यांच्याकडे मशनरी उपलब्ध नसेल तर त्यांनी यासाठी दुसरा ठेकदार नेमावा. ते या कामाचे पैसे घेतात.
मा.मुकारी अलगुडे–मा.आयुक्त साहेब,याप्रमाणेच ठेकेदारांना कामे द्यावीत. पूर्वी याप्रमाणेच कामे होत होती.
मा.अध्यक्ष–आपण जर याप्रमाणे नियोजन केले तर तुम्हाला कोठेही खड्डे दिसणार नाहीत.
मा.ॲड.अभय छाजेड–आमचे असे म्हणणे आहे की,आपण लोकांची सुविधा पहावी. तुम्ही ठेकेदाराला इन्सीस्ट करू शकत नाही का?
मा.हेमंत रासने–यामध्ये तुम्ही तांत्रिक दृष्टीकोन पहावा. लोकांच्या अडचणी होता कामा नयेत.
मा.मुकारी अलगुडे–माझ्या भागात पाणी पुरवठयाची लाईन टाकली आहे परंतु तेथे अजूनही डांबरीकरणाचे काम झालेले नाही. हे काम पूर्ण झाले आहे की नाही, याबाबत पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी पहात नाहीत का? पूर्वी असे होते की, ज्या ठेकेदाराला आपण कामे देतो त्यांच्याकडूनच डांबरीकरण करून घेत होते.
मा.अध्यक्ष–आम्ही आता सूचना दिलेल्या आहेत आणि या पुढील कामांची टेडर्स रिईन्स्टेंटमेंटचे ॲटम समाविष्ट करूनच काढावीत.
मा.महा.आयुक्त– यामध्ये माझे सजेशन असे आहे की, त्याच कॉन्ट्रक्टरकडून इस्टीमेंट करून हे काम करून घ्यावे आणि या कामाचे अंतिम बिल अदा करताना पथ विभागाच्या अधिकाऱ्यांनी सर्टिफाय करावे की, सदरचे रिसर्फेसिंग योग्य पध्दतीने केले आहे की नाही. अन्यथा खड्डे घेतले आणि नॉमिनल रिईन्सटींमेट करेल आणि तुम्ही बिल अदा कराल.
मा.पृथ्वीराज सुतार–त्याठिकाणी संबंधीत जे.ई.आहेतच.

मा.महा.आयुक्त– पथ विभागाचे अधिकारी आहे त्यांच्याकडून सर्टिफाय करून घ्यावे.
मा.अध्यक्ष–आपल्याकडे जे जे.ई.आहेत त्यांनी सुध्दा सर्व विभागाकडे काम केलेले असते. ते सुध्दा सर्टिफाय करू शकतील
मा.मुकारी अलगुडे–जो ठेकेदार काम घेतो त्याच्याकडे सर्वप्रकारची उपलब्धतता असते.
मा.ॲड.अभय छाजेड–आपल्या अभियंत्यांना सुध्दा तांत्रिक ज्ञान असते.
मा.रविंद्र धंगेकर–मा.अध्यक्ष, पाण्याची लाईन किंवा ड्रेनेज लाईन टाकणे या कामामध्ये हा ॲटम गृहीत धरलेला असतो परंतु काही ठेकेदारामधूनच पळून जातात.
मा.महा.आयुक्त– मग ते का करीत नाहीत.
मा.हेमंत रासने–ज्या ठिकाणी हे काम असेल, तेथील संबंधीत अधिकाऱ्याची जबाबदारी निश्चित करावी.
मा.पृथ्वीराज सुतार–रस्त्याचे काम पूर्ण झाल्याशिवाय त्यांना फायनल बिलाचे पेमेंट देऊ नये, अशा सूचना द्याव्यात.
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.४३१**

प्रभाग क्र. ३४ कर्वे रस्ता करिश्मा चौक लगत मारुती मंदिर येथे भुयारी पादचारी मार्ग बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निखिल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४,१९,९२,३२५=६३ पेक्षा ७.६०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३,८८,००,९०८=८८ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी व शर्तीतील सर्वसाधारण भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक आदा/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/जनेराशपुअ क्र.१/१४५ दि. १/७/२०१४ चे पत्र.
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.४३२**

प्रभाग क्र. ३४ पौड रस्ता आनंदनगर चौक येथे भुयारी पादचारी मार्ग बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.कृष्णा कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२,५०,९८,३२१=६४ पेक्षा ४% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु. २,६१,०२,२५४=५० पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी व शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक आदा/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/जनेराशपुअ क्र.१/१४६ दि. १/७/२०१४ चे पत्र.
मा.नगरसचिव–सदरचे टेंडर ४ टक्के अबॉव्हू आहे.
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.४३३**

प्रभाग क्र. ३६ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ५० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.अनिल राणे यांचे दि. २७/६/२०१४ चे पत्र.
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४३४**

प्रभाग क्र. १९ ब मधील स.नं. २५ ॲकोलाईट सोसायटी, वडगांवशेरी येथे गार्डन विकसित करणेसाठी र.रू. ५० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.सुमन पठारे यांचे दि. २७/६/२०१४ चे पत्र.
मा.नगरसचिव–ही तरतूद स यादीतील आहे.
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.
मा.नगरसचिव–आज दाखल मान्य होणारे सर्व विषय वन के अंतर्गत घ्यावेत किंवा कसे?
मा.पृथ्वीराज सुतार–यामधील फक्त स यादीतील विषयच वन के अंतर्गत घ्यावेत.
मा.अध्यक्ष–होय, स यादीतील विषय वन के अंतर्गत घ्यावेत. स यादी व्यतिरिक्त असलेले विषय घेऊ नयेत.
मा.योगेश मुळीक– स यादी सोडून बाकीचे सगळे वगळावेत.

**दाखल विषय क्र.४३५**

प्रभाग क्र. ५१ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. २४ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.दीपक मानकर व मा.सौ.मनिषा घाटे यांचे दि. ३०/६/२०१४ चे पत्र
मा.नगरसचिव–मा.दिपक मानकर, मा.सौ.घाटे २४ लाखाचे वर्गीकरण ही तरतूद स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष–र.रू.४ लाख कमी करून, हा विषय मान्य करावा.
मा.नगरसचिव– हा विषय २० लाख रूपयांपर्यंत मान्य करावा लागेल. उर्वरित ४ लाख रू.ही तरतूद स यादीतील नाही.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून र.रू.२० लाखाचे वर्गीकरण मान्य करण्यात आले.

**दाखल विषय क्र. ४३६**

प्रभाग क्र. ४ ब मधील विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणेसाठी र.रू. ४० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, (मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.) याबाबत मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे यांचे दि. ३०/६/२०१४ चे पत्र.
मा.नगरसचिव–ही तरतूद स यादीतील आहे.
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४३७**

प्रभाग क्र. ११ अ मधील विविध ठिकाणचे रस्ते काँक्रीटीकरण करणेसाठी र.रू. ७० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. ३०/६/२०१४ चे पत्र.
मा.नगरसचिव–स यादीतील आहे.
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४३८**

प्रभाग क्र. ४१ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, मा.सौ.सुरेखा कवडे व मा.सौ.मिनल सरवदे यांचे दि. ३०/६/२०१४ चे पत्र.
मा.नगरसचिव–ही तरतूद स यादीतील आहे.
मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा आणि एकत्रित टेंडर काढावे.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.

**दाखल विषय क्र.४३९**

कर्वे रोड, नळ स्टॉप चौक ते म्हात्रे पूल, खिलारे पथ रस्ता (शारदा सेंटर रस्ता) व अंतर्गत रस्ते या ठिकाणी गेली अनेक वर्षे मोठमोठया आय.टी. व इतर कंपन्यांची ऑफिसेस व हॉस्पीटल, कॉलेज, शाळा, क्लासेस, हॉटेल्स व छोटे मोठे अनेक व्यवसायिक या परिसरात आहेत व तिथे अस्तित्वात असलेले अरूंद रस्ते व अपुरी पार्किग व्यवस्था, येणाऱ्या वाहनांची संख्या पाहता व रस्त्यांवर दुर्तफा होणारी पार्किंग अशा अनेक कारणांमुळे या भागात दररोज खूप वाहतूक कोंडी होत आहे. या सर्व गोष्टींचा स्थानिक नागरीकांना त्रास सहन करावा लागतो. या विषयासाठी आम्ही अनेकवेळा अनेक आंदोलने केली आहेत. या सर्व गोष्टींवर उपाय म्हणून सन १९८७ च्या विकास आराखड्यामध्ये कर्वे रोड, नळस्टॉप चौंक येथे पार्किंगचे आरक्षण टाकण्यात आले आहे, पण प्रशासनाने अनेक वर्षे झाली तरी सदरची जागा ताब्यात घेण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. याचाच अर्थ प्रशासनाला पुणेकर नागरीकांचे कोणतेही सोयरेसुतक नसल्याचे दिसून येत आहे. याबाबत संबंधीत खात्याला वेळोवेळी लेखी पत्रे देण्यात आली आहेत, अनेक वेळा तोंडी पाठपुरावा केला आहे. परंतु त्यांनी कोणतीही उपाययोजना केली नसल्याचे दिसून येते. या ठिकाणची पार्किंगच्या आरक्षणाची जागा ताब्यात घेऊन, जर येथे मनपाचे सार्वजनिक पार्किंग विकसीत केले असते तर या रस्त्यांवरील वाहने या पार्किंगमध्ये पार्क होऊन रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास निश्चितच मदत झाली असती व या भागातील वाहतूक सुरळीत झाली असती. आज या अभावामुळे या रस्त्यांवर अनेक छोटे मोठे अपघाताचे प्रकार घडतात. या प्रशासनाच्या हलगर्जीपणाचा त्रास पुणेकरांना होतो.

तरी एरंडवणा, स.नं.९क (पीटी)१०(पार्ट) नळस्टॉप ते फायरबिग्रेड येथे १९८७ चे विकास आराखडयामध्ये पार्किंगचे आरक्षण आहे. कर्वे रस्त्यावरील वाहतूकीची व पार्किंगची समस्या लक्षात घेता सदर पार्किंगचे भूसंपादन करून मिळकत त्वरीत ताब्यात घेणेत यावी व सदर जमीनीचे भूसंपादन ६ महिन्यात पूर्ण करणेत यावे, याबाबत मा.अनिल राणे व मा.अजय तायडे यांचे दि. १/७/२०१४ चे पत्र.
मा.ॲड.अभय छाजेड–या विषयाबाबत प्रशासनाचा अभिप्राय घ्यावा .
**निर्णय–**सदर दाखल प्रस्तावावर मा.महा.आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

**दाखल विषय क्र.४४०**

(स्थायी समिती ठराव क्र.७४, दि.६/५/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्र.क्र. ५९ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.३० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे फेरविचाराचे पत्र.
मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा आणि एकत्रित टेंडर काढावे.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.

**दाखल विषय क्र. ४४१**
(स्थायी समिती ठराव क्र.७५, दि.६/५/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. ५९ अ मध्ये उल्हास मंडळ ते राजा वॉटरपर्यंत व विविध ठिकाणी यु.टी.डब्ल्यु.टी पध्दतीने रस्ते कॉंक्रीट करणेसाठी र.रू. १५ लाखाचे वर्गीकरण करण्याबाबतचे मा.सभासदांचे पत्र मागे घेण्यास मान्यता देण्याबाबत, मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे फेरविचाराचे पत्र.

मा.नगरसचिव–यामध्ये १५ लाख रू.चे वर्गीकरण आहे. परंतु संबंधीत सदस्यानी प्रस्ताव मागे घेत असल्याचे पत्र दिले आहे.

मा.अध्यक्ष– हा प्रस्ताव मागे घेण्यात यावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मा.सभासद यांचा प्रस्ताव मागे घेण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४४२**
(स्थायी समिती ठराव क्र.७६, दि.६/५/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. १२ अ मध्ये विविध ठिकाणी पाण्याच्या लाईन्स टाकणेसाठी र.रू.२३ लाखाचे वर्गीकरण करण्याबाबतचे मा.सभासदांचे पत्र मागे घेण्यास मान्यता देणे यासाठी मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे फेरविचाराचे पत्र.

मा.नगरसचिव–यामध्ये २३ लाख रू.चे वर्गीकरण आहे. परंतु संबंधीत सदस्यानी प्रस्ताव मागे घेत असल्याचे पत्र दिले आहे.

मा.अध्यक्ष– हा प्रस्ताव मागे घेण्यात यावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मा.सभासद यांचा प्रस्ताव मागे घेण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४४३**
(स्थायी समिती ठराव क्र.१२७, दि.१३/५/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र.४५ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे फेरविचाराचे पत्र.

मा.नगरसचिव–ही तरतूद स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४४४**
(स्थायी समिती ठराव क्र.१२८, दि.१३/५/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र.४५ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–प्र.क्र.४५ ब मध्ये २० लाखाचे वर्गीकरण आहे. ही तरतूद स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४४५**
(स्थायी समिती ठराव क्र.१२९, दि.१३/५/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र.४५ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–ही तरतूद स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा आणि एकत्रित टेंडर काढावे.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.

**दाखल विषय क्र. ४४६**
(स्थायी समिती ठराव क्र.१३०, दि.१३/५/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र.४५ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी,याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–ही तरतूद स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा आणि एकत्रित टेंडर काढावे.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.

**दाखल विषय क्र. ४४७**

(स्थायी समिती ठराव क्र.१३१, दि.१३/५/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र.४५ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी,याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–ही तरतूद स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा आणि एकत्रित टेंडर काढावे.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.

**दाखल विषय क्र. ४४८**

(स्थायी समिती ठराव क्र.१३२, दि.१३/५/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र.४५ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ३० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी,याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–हे स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा आणि एकत्रित टेंडर काढावे.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.

**दाखल विषय क्र. ४४९**

(स्थायी समिती ठराव क्र.१३३, दि.१३/५/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र.४५ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. २० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–प्र.क्र.४५ ब मध्ये २० लाखाचे वर्गीकरण आहे. ही तरतूद स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

मा.पृथ्वीराज सुतार– हे विषय कोणाचे आहेत? आम्हाला काहीच कळत नाहीत.

मा.नगरसचिव–हे सर्व मा.सभासदाचे प्रस्ताव आहेत.

मा.अध्यक्ष–मा.सभासदाचे वर्गीकरणाचे विषय पुढील सभेसाठी घेण्यासाठी आले होते परंतु आता हे विषय फेरविचाराव्दारे कमिटीसमोर सादर करीत आहोत.

मा.सौ.मोनिका मोहोळ–प्रभाग क्रंमाक वाचून दाखवावा.

मा.नगरसचिव–आता पुकारलेले सर्व विषय प्रभाग क्रं.४५ मधील होते.

**दाखल विषय क्र. ४५०**

(स्थायी समिती ठराव क्र.१४०, दि.१३/५/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. ६५ अ मध्ये विविध ठिकाणी घोरपडे पेठ येथील स्वच्छतागृह दुरुस्ती करणेसाठी र.रू. १० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४५१**

(स्थायी समिती ठराव क्र.१४४, दि.१३/५/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. २० अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी रक्कम रु. ३० लाखांचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.अध्यक्ष– स यादीतील असेल तर सगळी मान्य करावी आणि डिव्हाडेशन असेल तर एकत्रित करावे. हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४५२**

(स्थायी समिती ठराव क्र.१४५, दि.१३/५/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. २० मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी रक्कम रु. १ कोटींचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–प्रभाग क्र.२० मध्ये १ कोटीचे वर्गीकरण आहे.

मा.पृथ्वीराज सुतार– मी सर्व विषयांच्या बाबतीत एकच सूचना देतो की, जरी विभागणी केली असेल तरी सुध्दा एकच टेंडर काढण्यात यावे.

मा.अध्यक्ष–आम्ही तसा शेरा दिला आहे. हा विषय मान्य, एकत्रित टेंडर काढावे.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.

**दाखल विषय क्र. ४५३**
(स्थायी समिती ठराव क्र.१८६, दि.२०/५/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)
प्रभाग क्र. ३५ मधील पडीक हद्दीची ठेकेदारी पध्दतीने स्वच्छता करुन घेणेसाठी र.रू.१० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.
मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४५४**
(स्थायी समिती ठराव क्र.१८७, दि.२०/५/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)
प्रभाग क्र. २०अ मध्ये मगरपट्टा येथील अण्णासाहेब मगर हॉस्पिटल येथे इमारत बांधणेसाठी रक्कम रु. १ कोटींचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.
मा.अध्यक्ष–हे स यादीतील आहे, हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४५५**
(स्थायी समिती ठराव क्र.१८८, दि.२०/५/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)
प्रभाग क्र.१२ अ मध्ये नाला सुधारणा विषयक कामे करणेसाठी र.रू. २३ लाखाचे वर्गीकरण करण्याबाबतचे मा.सभासदांचे पत्र मागे घेण्यास मान्यता देण्याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७/२०१४ चे पत्र.
मा.नगरसचिव–यामध्ये २३ लाख रू.चे वर्गीकरण आहे. परंतु संबंधीत सदस्यानी प्रस्ताव मागे घेत असल्याचे पत्र दिले आहे.
मा.अध्यक्ष– हा प्रस्ताव मागे घेण्यात यावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मा.सभासद यांचा प्रस्ताव मागे घेण्यात आला.

**दाखल विषय क्र.४५६**
(स्थायी समिती ठराव क्र.२४०, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)
प्रभाग क्र.५१ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. ३० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.
मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा आणि एकत्रित टेंडर काढावे.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.

**दाखल विषय क्र.४५७**
(स्थायी समिती ठराव क्र.२४१, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)
प्रभाग क्र.५१ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. १४ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.
मा.नगरसचिव–प्र.क्र.५१ ब मध्ये १४ लाखाचे वर्गीकरण आहे. ही तरतूद स यादीतील आहे.
मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४५८**
(स्थायी समिती ठराव क्र.२४२, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)
सिंहगड किल्ल्यावर नरवीर तानाजी मालुसरे समाधी स्थळ येथे स्वराज्यनिष्ठा शिल्प व परिसर विकसित करणेसाठी र.रु.३ कोटीचे वर्गीकरण करण्यास मान्यता मिळणेबाबत, मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७/२०१४ चे पत्र.
मा.नगरसचिव–या विषयाला अनुसरून मा.सचिन दोडके यांचे पत्र आले आहे की, वारजे येथील नाट्यगृह बांधणे याकामासाठी २ कोटी रू.ची तरतूद करण्यात आली आहे. या कामासाठी काही रक्कम आवश्यक आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–या विषयाबाबत अभिप्राय घ्यावा.
मा.अध्यक्ष–सदर विषयाबाबत अभिप्राय घ्यावा.
मा.पृथ्वीराज सुतार–हे मान्य करता येईल का?

मा.नगरसचिव–दोन्ही स यादीतील तरतूदी आहे. एक दोन कोटी रू.चे आहे व दुसरे १ कोटी रू.चे आहे, असे मिळून ३ कोटीचे वर्गीकरण आहे. आपण हा विषय अभिप्रायसाठी पाठवित आहोत.

**निर्णय–**सदर दाखल प्रस्तावावर मा.महा.आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

**दाखल विषय क्र. ४५९**

(स्थायी समिती ठराव क्र.२४३, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. ३१ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.२० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव– ही तरतूद स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४६०**

(स्थायी समिती ठराव क्र.२४४, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. ६ अ मध्ये हॉकी स्टेडियम शेजारी बहूउददेशीय हॉल बांधणेसाठी र.रु.३० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४६१**

(स्थायी समिती ठराव क्र.२४५, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. ६ अ मध्ये सम्राटनगर येथील बौध्द समाजमंदिर बांधणेसाठी र.रु.१० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव– ही तरतूद स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४६२**

(स्थायी समिती ठराव क्र.२४६, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. ६ अ मध्ये माता रमाबाई आंबेडकर शाळेत सिमाभिंत बांधणेसाठी र.रु.२० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४६३**

(स्थायी समिती ठराव क्र.२४७, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. १७ अ मधील विविध ठिकाणी कॉंक्रीट करुन ब्लॉक बसविणेसाठी र.रुपये १० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–प्र.क्र.१७ अ मध्ये कॉक्रीट करून ब्लॉक बसविणे यासाठी १० लाख रू.चे वर्गीकरण आहे. ही तरतूद स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४६४**

(स्थायी समिती ठराव क्र.२४८, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. १७ अ मधील विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणेसाठी र.रुपये २० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–प्र.क्र.१७ अ साठी २० लाख रू.चे वर्गीकरण आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४६५**

(स्थायी समिती ठराव क्र.२४९, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. १७ अ मधील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्थेत सुधारणा कामे करणेसाठी र.रुपये १० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–प्र.क्र.१७ अ मध्ये प्रकाश व्यवस्था करणे यासाठी १० लाख रू.चे वर्गीकरण आहे. ही तरतूद स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४६६**

(स्थायी समिती ठराव क्र.२५०, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. १७ अ मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रुपये २० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–प्र.क्र.१७ मध्ये विविध कामे करणे यासाठी १० लाख रू.चे वर्गीकरण आहे.

मा.चेतन तुपे–सदरचा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४६७**

(स्थायी समिती ठराव क्र.२५३, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. ४ अ मध्ये चॅम्पीयन मशिनच्या सहाय्याने चेंबर साफ करणेसाठी र.रुपये १५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.शंकर केमसे–याबाबत माहिती द्यावी.

मा.अध्यक्ष– चॅम्पीयन मशीनने साफसफाई करणेबाबतचा विषय आहे.

मा.रविंद्र धंगेकर–हा विषय मान्य करावा.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.४६८**

(स्थायी समिती ठराव क्र.२८०, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. २२ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. २५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–प्र.क्र.२२ ब मध्ये २५ लाखाचे वर्गीकरण आहे, ही तरतूद स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा आणि एकत्रित टेंडर काढावे.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.

**दाखल विषय क्र.४६९**

(स्थायी समिती ठराव क्र.२८१, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. २२ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. ३० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७/२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–प्र.क्र.२२ ब मध्ये ३० लाखाचे वर्गीकरण आहे, ही तरतूद स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा आणि एकत्रित टेंडर काढावे.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.

**दाखल विषय क्र. ४७०**

(स्थायी समिती ठराव क्र.२८२, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. १८ अ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे,दुरुस्ती करणे व इतर तदनुषंगिक कामे करणेसाठी र.रु. १५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७/२०१४ चे पत्र.

मा.शंकर केमसे–याबाबत माहिती द्यावी.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–आपल्याकडे एकूण जेटींग मशीन किती आहेत? याबाबत माहिती द्यावी.

मा.चेतन तुपे–मा.अध्यक्ष, मी याबाबत माहिती देतो. काही ठिकाणी दाट झोपडपट्टी आहे त्याठिकाणी जेंटीग मशीन जाऊ शकत नाही. तेथील साफसफाई करण्यासाठी आपण सर्व क्षेत्रिय कार्यालयांना तरतूद उपलब्ध करून दिली आहे परंतु त्या ठिकाणी जादा खर्च येत असल्यामुळे ही साफसफाई ठेकेदारामार्फत करावी लागते.
मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.४७१**
(स्थायी समिती ठराव क्र.२८५, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)
प्रभाग क्र.२८ अ, मध्ये विविध ठिकाणी भूमीगत केबल टाकणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.
मा.नगरसचिव–प्र.क्र.२८ अ मध्ये भूमीगत केबल टाकणे यासाठी २० लाखाचे वर्गीकरण आहे. ही तरतूद स यादीतील आहे.
मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४७२**
(स्थायी समिती ठराव क्र.२८६, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)
प्रभाग क्र.२८ अ, मध्ये विविध ठिकाणी भूमीगत केबल टाकणेसाठी र.रू.१० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७/२०१४ चे पत्र.
मा.नगरसचिव–प्र.क्र.२८ अ मध्ये भूमीगत केबल टाकणे यासाठी १० लाखाचे वर्गीकरण आहे. ही तरतूद स यादीतील आहे.
मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४७३**
(स्थायी समिती ठराव क्र.२८७, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)
प्रभाग क्र. ६३ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. २० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.
मा.नगरसचिव–प्र.क्र.६३ ब मध्ये लोखंडी बेचेंस बसविणे आणि ट्रिमिक्स कॉक्रीट करणे यासाठी २० लाखाचे वर्गीकरण आहे.
मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४७४**
(स्थायी समिती ठराव क्र.२८८, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)
प्रभाग क्र.५४ अ मध्ये जोरी गोठा प्रयेजासिटी व रायकर वस्ती परिसर येथे पाण्याची लाईन टाकणेसाठी र.रु.२० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.
मा.नगरसचिव–प्र.क्र.५४ अ मध्ये पाण्याची लाईन टाकणे यासाठी २० लाख रू.चे वर्गीकरण आहे.
मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४७५**
(स्थायी समिती ठराव क्र.२८९, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)
प्रभाग क्र. ४७ ब मध्ये हरकानगर येथे सिमेंट कॉंक्रीट करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.
मा.नगरसचिव–प्र.क्र.४७ ब, हरकानगर मध्ये सिमेंट कॉक्रीटीकरण करणे यासाठी १० लाख रू.चे वर्गीकरण आहे. ही तरतूद स यादीतील आहे.
मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.
**दाखल विषय क्र. ४७६**
(स्थायी समिती ठराव क्र.२९०, दि.१०/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)
प्रभाग क्र. ४७ ब मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रु.२० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–प्र.क्र.४७ ब, मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे व सिमेंट कॉक्रीटीकरण करणे यासाठी २० लाख रू.चे वर्गीकरण आहे.
मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४७७**
(स्थायी समिती ठराव क्र.३१५, दि.१७/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)
प्रभाग क्र. २३ ब मध्ये स.नं. ११०० भोई आळी कचरा कुंडीच्या जागेत दुमजली कोठी बांधणेसाठी र.रू. १५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.
मा.नगरसचिव–प्र.क्र.२३ ब साठी १५ लाख रू.चे वर्गीकरण आहे.
मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा. ही तरतूद स यादीतील आहे.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४७८**
(स्थायी समिती ठराव क्र.३१६, दि.१७/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)
प्रभाग क्र. २३ ब मध्ये स.नं. १३०९, १४९५ येथे आजी–आजोबा उद्यान विकसित करणेसाठी र.रू.२० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.
मा.नगरसचिव–प्र.क्र.२३ ब साठी २० लाख रू.चे वर्गीकरण आहे.
मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४७९**
(स्थायी समिती ठराव क्र.३१७, दि.१७/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)
प्रभाग क्र. २३ ब मध्ये सुर्या हॉस्पिटल समोर एस.एच.चे बसस्टॉप बसविणेसाठी र.रू. ७ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, (मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.) याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.
मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४८०**
(स्थायी समिती ठराव क्र.३१८, दि.१७/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)
प्रभाग क्र. ५९ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबतमा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.
मा.नगरसचिव–प्रभाग क्रं.५९ अ साठी २० लाख रू.चे वर्गीकरण करावे लागेल. कारण क अंदाजपत्रकातून १० लाख रू. घेण्यात येत आहेत. परंतु हे १० लाख रू.काढता येणार नाहीत. त्यामुळे २० लाखाचे वर्गीकरण मान्य करावे लागेल.
मा.अध्यक्ष– ती रक्कम वगळून हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून र.रू. २० लाखाचे वर्गीकरण मान्य करण्यात आले.

**दाखल विषय क्र. ४८१**
(स्थायी समिती ठराव क्र.३१९, दि.१७/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)
प्रभाग क्र. ५९ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.४० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.
मा.नगरसचिव–प्र.क्र.५९ अ मध्ये ४० लाखाचे वर्गीकरण आहे, ही तरतूद स यादीतील आहे.
मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा आणि एकत्रित टेंडर काढावे.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.

**दाखल विषय क्र. ४८२**
(स्थायी समिती ठराव क्र.३२१, दि.१७/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)
प्रभाग क्र. ६४ ब मध्ये चॅम्पीयन मशिनच्या साह्याने ड्रेनेज लाईन साफसफाई करणेसाठी र.रू. १० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.
मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.४८३**

(स्थायी समिती ठराव क्र.३२२, दि.१७/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. ६४ ब मध्ये चॅम्पीयन मशिनच्या साह्याने ड्रेनेज लाईन साफसफाई करणेसाठी र.रू. १० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–प्र.क्र.६४ ब मध्ये साफसफाई करणेसाठी १० लाख रू.चे वर्गीकरण आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४८४**

(स्थायी समिती ठराव क्र.३२३, दि.१७/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. ३ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.५० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव– ही तरतूद स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा आणि एकत्रित टेंडर काढावे.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.

**दाखल विषय क्र. ४८५**

(स्थायी समिती ठराव क्र.३२४, दि.१७/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. ३ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.४० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७/२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–प्र.क्र.३ अ मध्ये ४० लाखाचे वर्गीकरण आहे, ही तरतूद स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा आणि एकत्रित टेंडर काढावे.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.

**दाखल विषय क्र.४८६**

(स्थायी समिती ठराव क्र.३२५, दि.१७/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. ३ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.३० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–प्र.क्र.३ अ मध्ये ३० लाखाचे वर्गीकरण आहे, ही तरतूद स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा आणि एकत्रित टेंडर काढावे.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.

**दाखल विषय क्र. ४८७**

(स्थायी समिती ठराव क्र.३२६, दि.१७/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. ३ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.३० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव– ही तरतूद स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा आणि एकत्रित टेंडर काढावे.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.

**दाखल विषय क्र. ४८८**

(स्थायी समिती ठराव क्र.३२७, दि.१७/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र.११ ब, मधील गोपाळ कृष्ण मित्र मंडळ येथील विठ्ठल रूक्मिणी मंदिरासमोरील रस्ता यु.टी.डब्ल्यू.टी पध्दतीने सिमेंट कॉंक्रीट करणेसाठी र.रू.२० लाख व प्रभाग क्र.११ ब, मधील गोपाळ कृष्ण मित्रमंडळ येथील विठ्ठल रूक्मिणी मंदिरासमोर पी.टी.एल.विद्युत पोल , दिवे बसविणेसाठी र.रू.५ लाख असे एकूण र.रू. २५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–प्र.क्र.११ ब मध्ये २५ लाखाचे टेंडर आहे. कामे वेगवेगळी आहेत.

मा.अध्यक्ष– कोणकोणती कामे आहेत?

मा.नगरसचिव–एक विद्युतचे आणि एक पथ विभागाचे काम आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४८९**

(स्थायी समिती ठराव क्र.३३०, दि.१७/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. २० ब परिसरात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन साफसफाई करणेसाठी र.रू. १० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७/२०१४ चे पत्र.

मा.नगरसचिव–प्र.क्र.२० ब परिसरामध्ये ड्रेनेज लाईन साफसफाई करणेसाठी १० लाख रू.चे वर्गीकरण आहे.

मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. ४९०**

मा.सौ.मोनिका मोहोळ व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १/७ /२०१४ चे पत्र.

(स्थायी समिती ठराव क्र.३३१, दि.१७/६/२०१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्रभाग क्र. २० अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

मा.नगरसचिव–प्र.क्र.२० अ मध्ये ३० लाखाचे वर्गीकरण आहे, ही तरतूद स यादीतील आहे.

मा.अध्यक्ष– मान्य, एकत्रित टेंडर काढावे.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.

विषय–

(मा.सौ.मोहोळ,मा.सौ.ओरसे स्थायी समिती ठ.क्र.१३९, दि.१३/५/१४ चा फेरविचार करण्यात यावा.)

प्र.क्र.६५ अ मध्ये ५० लाखाचे वर्गीकरणाचा विषय आहे.

मा.सौ.कमल व्यवहारे–६५ अ मधील कोणती कामे सुचविण्यात आली आहेत?

मा.नगरसचिव–विविध ठिकाणी लाईटचे पोल्स बसविणे

मा.सौ.कमल व्यवहारे–सर्व कामांच्या पुढे ६५ अ असे लिहले आहे का?

मा.नगरसचिव–सगळ्या कामांच्या ठिकाणी ६५ अ असे लिहले आहे.

मा.सौ.कमल व्यवहारे–हा विषय पाहण्यासाठी द्यावा.

मा.नगरसचिव–मी हा विषय बाजूला ठेवतो तो पर्यंत दुसरा विषय घेतो.

**<u>वृत्तांत कायम करणे.</u>**

सभा क्र.४ दि.२४/४/२०१४ चा वृत्तांत कायम करण्यात आला.

**<u>कार्यपत्रिकेवरील विषय</u>**

विषय क्र.३९३

मा.अध्यक्ष–नोंद घेण्यात आली.

निर्णय– मा.सह महा.आयुक्त घनकचरा व्यवस्थापन यांनी पाठविलेल्या अहवालाचे अवलोकन करून नोंद घेण्यात आली.

विषय क्र.३९४

मा.अध्यक्ष–या विषयाबाबत प्रशासनाचा अभिप्राय घ्यावा.

निर्णय–सदर विषयावर मा.महा.आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

विषय क्र.३९५

मा.अध्यक्ष–विषय क्र.३९५, विषय क्र.३९६ दफ्तरी दाखल करावेत.

मा.रविंद्र धंगेकर– आपण संबंधीत सभासदाना विचारले आहे का?

मा.अध्यक्ष–हा विषय स यादीतील नाही.

मा.नगरसचिव–आपण दोन्ही प्रस्ताव मागे घ्यावेत.

मा.रविंद्र धंगेकर– ठीक आहे, आम्ही प्रस्ताव मागे घेतो.

निर्णय–मा.सभासदाचे पत्र मागे घेण्यात आले.

विषय क्र.३९६

निर्णय–मा.सभासदाचे पत्र मागे घेण्यात आले.

विषय क्र.३९७

मा.नगरसचिव–र.रू.३० लाखाचे वर्गीकरण आहे.

मा.रविंद्र धंगेकर–यामध्ये एकत्रित टेंडर काढावे.

निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.३९८
मा.रविंद्र धंगेकर–पावसाळी लाईन साफ करणे व जेंटीग मशीनने गाळ काढणे हे काम एकच आहे.
मा.अध्यक्ष–इतर कामे वेगळी आहेत.
मा.रविंद्र धंगेकर–ती एकत्रित करून टेंडर काढावेत.
मा.नगरसचिव–सदरचा विषय मान्य,अनु.१,३,४ एकत्रित टेंडर आणि अनु.२,५ चे एकत्रित टेंडर काढावे.
मा.पृथ्वीराज सुतार–हा विषय मान्य करावा.
निर्णय–सदरचा विषयाबाबत सर्वानुमते अनु.१,३,४ एकत्रित टेंडर आणि अनु.२,५ चे एकत्रित टेंडर काढणेस मान्यता देण्यात आली.
विषय क्र.३९९
मा.रविंद्र धंगेकर–हा विषय मान्य करावा.
निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.४००
मा.सौ.कमल व्यवहारे–हा विषय मान्य करावा.
निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.४०१
मा.सौ.कमल व्यवहारे–विषय मान्य, एकत्रित टेंडर काढावे.
निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.४०२
मा.सौ.कमल व्यवहारे–विषय मान्य, एकत्रित टेंडर काढावे.
निर्णय–सदर विषयाबाबत सर्वानुमते एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.
विषय क्र.४०३
मा.सौ.कमल व्यवहारे–हा विषय मान्य करावा.
निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.४०४
मा.नगरसचिव–या विषयामध्ये क अंदाजपत्रकातील रक्कम, अ अंदाजपत्रकामध्ये येत आहे.
मा.ॲड.अभय छाजेड–हा विषय अमान्य करावा.
मा.पृथ्वीराज सुतार–आम्ही हा प्रस्ताव मागे घेत आहोत.
निर्णय–मा.सभासदाचा प्रस्ताव मागे घेण्यात आला.
विषय क्र.४०५
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.
निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.४०६
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.
निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.४०७
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.
निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
मा.ॲड.अभय छाजेड– अंदाजपत्रकातील अ व क बजेट एकत्र करण्यास हरकत काय आहे? खूप मोठया प्रमाणावर पाणी पुरवठा विषयक कामे करता येतील. याबाबत माहिती द्यावी.
मा.सौ.कळस्कर,मुख्यलेखापाल–पाणी पुरवठा, ड्रेनेज या कामांची तरतूद वर्गीकृत करता येत नाही, अशी बी.पी.एम.सी.ॲक्टमध्ये तरतूद करण्यात आली आहे.
विषय क्र.४०८
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.
निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.४०९
मा.शंकर केमसे–हा विषय अमान्य करण्यात यावा.
मा.अध्यक्ष–हा विषय अमान्य करावा.
निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आला.
विषय क्र.४१०
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.
निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.४११
मा.पृथ्वीराज सुतार–या विषयामध्ये प्र.क्र.३ ब मधून प्र.क्र.२ साठी वर्गीकरण करण्यात येत आहे. ही प्रिटींग मिस्टेक आहे का?
मा.योगेश मुळीक–ही प्रिटींग मिस्टेक नाही कै.राजाराम भिकू पठारे (पाटील) ही शाळा प्रभाग क्र.३ ब मध्ये येते.
मा.ॲड.अभय छाजेड– ठीक आहे, हा विषय मान्य करावा.
मा.शंकर केमसे–या विषयामध्ये कोणतीही अडचण नाही.
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.
निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.४१२
मा.अध्यक्ष–सदरचा अहवाल ऑडीट उपसमितीकडे पाठविण्यात यावा.
निर्णय–सदर विषय मा.ऑडीट उपसमितीकडे पाठविण्यात येत आहे.
विषय क्र.४१३
मा.अध्यक्ष–सदरचा अहवाल ऑडीट उपसमितीकडे पाठविण्यात यावा.
निर्णय–सदर विषय मा.ऑडीट उपसमितीकडे पाठविण्यात येत आहे.
विषय क्र.४१४
मा.नगरसचिव–या विषयाबाबत अभिप्राय आलेला आहे. मी अभिप्राय वाचून दाखवितो,"संदर्भांकित ठरावानुसार, नाना पेठ घरांक ४०५ पैकी ४०६ येथील जागा गार्डन जी–५ यासाठी आरक्षित जागा भूसंपादन कायदा २०१३ अन्वये, अगर तडजोडीने संपादन करणेस मान्यता मिळणेसाठी " हे विषयपत्र सादर केले आहे. हा अभिप्राय पॉझिटीव्ह आहे.
मा.अध्यक्ष–अभिप्राय पॉझिटीव्ह आहे, अभिप्राय मान्य करावा.
निर्णय–सदर विषयाबाबत मा.महा.आयुक्त यांचा अभिप्राय मान्य करण्यात आला.
विषय क्र.४१५
मा.नगरसचिव– या विषयामध्ये दुरूस्ती आहे. या विषयामध्ये जे क्र.१ चे जे ठेकेदार आहेत आणि त्यांच्या इतकीच रक्कम देण्याबाबत श्री.सासवडे यांनी कबूल केले आहे. त्यामुळे ही जागा त्यांना द्यावी, असे खात्याचे पत्र आहे.
मा.आर.टी.शिंदे,उपायुक्त (भू.आणि जि.)– आपण मूळ भाडेकरूला प्राधान्य देत असतो आणि त्यांनी क्रंमाक १ च्या इतकी भाडे रक्कम देण्याचे मान्य केले आहे.
मा.ॲड.अभय छाजेड–ठीक आहे, नियमाप्रमाणे करावे.
मा.रविंद्र धंगेकर–आपण जुन्या भाडेकरूनांच देत आहोत का?
मा.आर.टी.शिंदे,उपायुक्त (भू.आणि जि.)– हो.
मा.रविंद्र धंगेकर–हा विषय मान्य करावा.
मा.अध्यक्ष–दुरूस्तीसह मान्य करावे.
निर्णय–सदर विषयाबाबतचा अभिप्राय, दुरूस्तीसह मान्य करण्यात आला.
विषय क्र.४१६
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.
निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.४१७
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.
निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.४१८
मा.अध्यक्ष– हा विषय मान्य करावा आणि एकत्रित टेंडर काढावे.
निर्णय–सदर विषयाबाबत सर्वानुमते एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.
विषय क्र.४१९
मा.ॲड.अभय छाजेड–हा विषय मान्य करावा.
निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.४२०
मा.पृथ्वीराज सुतार–हा विषय मान्य करावा.
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा आणि एकत्रित टेंडर काढावे.
निर्णय–सदर विषयाबाबत सर्वानुमते एकत्रित टेंडर काढण्यास मान्यता देण्यात आली.
विषय क्र.४२१
मा.पृथ्वीराज सुतार–आपण हे करणार आहोत का?
मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)– हे सुरक्षेच्या दृष्टीकोनातून केले जात आहे. हे महानगरपालिकेच्या माध्यमातून केले जात नाही.
मा.पृथ्वीराज सुतार–सदरचे काम मनपाने करावे यास प्रशासनाची काही हरकत आहे का?

मा.अध्यक्ष–आपल्याला याबाबत काही बंधन घातले आहे का?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)– आपल्यावर बंधन नाही. सी.सी.टी.व्ही.साठी कंट्रोल रूम स्थापन करणे आणि या सी.सी.टी. व्ही. चे फूटेज पोलिसांना देणे आणि त्यांनी ते वापरणे. आता असे होत आहे सिक्युरिटीच्या दृष्टीकोनातून हे कामकाज पोलिसांनी ठरविले आहे. आपल्याला त्या अनुषंगाने काम करावे लागणार आहे. त्यांनी जर या ठिकाणी मागणी केली तर आपण मान्य करू.

मा.ॲड.अभय छाजेड–मग आपण हा विषय अमान्य करू.

मा.पृथ्वीराज सुतार–मागे सुध्दा या विषयावर चर्चा झाली होती आम्ही जर एखाद्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही.फूटेजसाठी कंट्रोलची व्यवस्था निर्माण केली तर यामध्ये कोणती अडचण आहे?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)– आता आपण महानगरपालिकेच्या माध्यमातून वेगवेगळया ठिकाणी कामे केली आहेत, त्याचा डेटा आपल्याकडे ठेवता येत नाही.

मा.पृथ्वीराज सुतार–अनेक ठिकाणी हे कनेक्शन्स बंद आहेत, तोडले आहेत.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)– जर पोलीसांनी मागणी केली तर तसे करणे योग्य आहे आणि जर त्याचा वापर होत असेल तर योग्य राहील.

मा.पृथ्वीराज सुतार–आपण त्यांच्याकडून एन.ओ.सी.घेतली तर?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–एन.ओ.सी.नव्हे , हा वापर त्यांच्याकडून व्हावयास हवा, हा सुरक्षेचा विषय आहे.

मा.पृथ्वीराज सुतार–पोलीस काही करत नाहीत ते ही सगळी कामे आपल्याकडे ढकलत आहेत.

मा.आयुक्त–संपूर्ण शहरासाठी सी.सी.टी.व्ही.चा प्रोजेक्ट दिला आहे. आपण एक असा प्रस्ताव दिलेला आहे की, आपण पूर्वी बसविलेले सी.सी.टी.व्ही. कॅमेरे आणि ट्राफिक नियंत्रणासाठी बसविलेले कॅमेरे एकूण ७०० ते ८०० कॅमेरे आपल्याकडे मेंटेनेन्ससाठी घ्यावेत आणि आपल्या योजनेमध्ये जो कंट्रोल रूम स्थापन करण्यात येणार आहे त्यामध्ये हे कॅमेरे समाविष्ट करून घ्यावेत. आपण भविष्यकाळामध्ये शहरातील सर्व कॅमेरे कंपन्याकडे मेंटेनेन्ससाठी देणार आहोत त्यावेळी हे कॅमेरे समाविष्ट करून मेंटेनेन्ससाठी द्यावेत. त्याचा निर्णय झाल्यानंतर आपण कोणत्याही सी.सी.टी.व्ही.चे प्रस्ताव मान्य करणे योग्य राहील. अन्यथा आपण हे सुरू केल्यानंतर वर्षभर चालेल परंतु नंतर त्याचा मेंटेनेन्स होणार नाही आणि त्याचा काही उपयोग होणार नाही.

मा.पृथ्वीराज सुतार–आता आपण जे काही कॅमेरे बसविले आहेत. त्याची जबाबदारी कोणाची आहे?

मा.आयुक्त–मी तेच सांगतो की, आपण जे कॅमेरे बसविले आहेत त्याचा मेंटेनेन्स व्यवस्थित होत नाही त्यामुळे आपण मा.पोलिस आयुक्त यांच्याकडे एक प्रस्ताव दिलेला आहे की, जे कॅमेरे आम्ही बसविलेले आहेत ते सुध्दा तुमच्याकडे मेंटेनेन्ससाठी घ्यावेत. पुढील काळामध्ये कंपनीकडून ५ वर्षासाठी मेंटेनेन्स केला जाणार आहे. त्यामध्येच आपले कॅमेरे समाविष्ट करावेत, यासाठी राज्य सरकारकडून याची मान्यता घ्यावी कारण या मेंटेनेन्ससाठी अतिरिक्त खर्च येईल. तशी त्यांच्या टेंडरमध्ये तरतूद आहे त्यामुळे सध्या आपल्याकडे असलेले कॅमेरे त्यांच्याकडे मेंटेनेन्साठी द्यावेत आणि आपले कॅमरे त्याच्याकडील कॉमन कंट्रोल रूमला जोडावेत.

मा.पृथ्वीराज सुतार–याप्रमाणेच केले पाहिजे.

मा.आयुक्त–आपण त्याप्रमाणेच करीत आहोत. प्रस्ताव दिलेला आहे. पुढील बैठकीमध्ये मी स्वत: जाणार आहे.

मा.ॲड.अभय छाजेड–म्हणजे आपण येथे जे.एन.एन.यु.आर.एम. मध्ये जी ट्राफिक सिस्टीम घेतली होती ती आता रद्द झाली.

मा.आयुक्त–ती सिस्टीम आणि आपण मा.आमदार फंडातून जे कॅमेरे बसविले होते ते सगळे कॅमेरे यामध्ये समाविष्ट करणार आहोत.

मा.ॲड.अभय छाजेड– आपल्याला जे.एन.एन.यु.आर.एम.मध्ये जी ट्राफिक मॅनेजमेंट सिस्टीमसाठी मोठा निधी मिळाला होता आपण यामधून खूप कॅमेरे खरेदी केले होते.

मा.आयुक्त–ते कॅमेरे सुध्दा त्यांच्याकडे वर्ग करणार आहोत.

मा.ॲड.अभय छाजेड– आपण यासाठी बऱ्याच वेळा टेंडर काढले होते. त्या टेंडरचे काय झाले? हे माहिती नाही. ते टेंडर रद्द झाले का?

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–आपण पी.पी. पी. माध्यमातून एजन्सीची नेमणूक केली होती. याबाबत मनपा कोर्टमध्ये हिअरींग चालू आहे.

मा.पृथ्वीराज सुतार–ते दंडात्मक कारवाईचे आहे का?

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–होय.

मा.रविंद्र धंगेकर–दंडात्मक कारवाईचा विषय रद्द करावा.

मा.अध्यक्ष–हा विषय अमान्य करावा.

मा.पृथ्वीराज सुतार–नाही, आपण त्यांना हा प्रस्ताव मागे घेण्याबाबत विनंती करून कळवू.

मा.ॲड.अभय छाजेड–मग हा विषय पुढील सभेत घ्यावा.

मा.अध्यक्ष–हा विषय पुढील सभेत घ्यावा.

निर्णय–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

विषय क्र.४२२

मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.

निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.४२३
मा.अध्यक्ष– यामधील अनु.क्र.२ वगळून, ५४ लाख रू.ऐवजी र.रू.३४ लाख रू असा हा विषय मान्य करावा.
निर्णय–सदर विषयाबाबत सर्वानुमते अनु.क्र.२ वगळून र.रू ३४ लाख मान्य करण्यात आले.
विषय क्र.४२४
मा.योगेश मुळीक–हा विषय अमान्य करावा.
मा.पृथ्वीराज सुतार–या विषयाबाबत माहिती द्यावी. ते दरवेळी प्रस्ताव देतात त्याचे काम होत नाही? ते दोन वर्षापासून मागणी करीत आहेत.
मा.राजेंद्र राऊत,कार्य.अभि.(भवन)–आपण आता टेंडर्स मागविली आहेत.
मा.पृथ्वीराज सुतार–मग त्यांचे काम का होत नाही?
मा.राजेंद्र राऊत,कार्य.अभि.(भवन)–आता यासाठी निधीची आवश्यकता आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–हा प्रस्ताव मागील वर्षापासूनचा आहे. ते मागील वर्षापासून प्रयत्न करीत आहेत.
मा.राजेंद्र राऊत,कार्य.अभि.(भवन)–टेंडर मागविणे व इतर सर्व मंजुरी देणे यासाठी उशीर झाला आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–आपण टेंडर लावले आहे मग यासाठी तरतूद नाही का?
मा.राजेंद्र राऊत,कार्य.अभि.(भवन)–मागील वर्षी तरतूद होती आणि यासाठी यावर्षी तरतूद उपलब्ध नाही.
मा.पृथ्वीराज सुतार–याबाबत खात्याने जबाबदारी घ्यायला पाहिजे याचा अर्थ असा होतो की, हे काम यावर्षी सुध्दा होणार नाही.
मा.राजेंद्र राऊत,कार्य.अभि.(भवन)–गेल्यावर्षी स यादीतील तरतूद होती.
मा.पृथ्वीराज सुतार–तरतूद कोणतीही असो, काम व्हायला पाहिजे होते. यावर्षी तरी काम होणार आहे का?
मा.राजेंद्र राऊत,कार्य.अभि.(भवन)–वर्गीकरण उपलब्ध झाले तर काम होईल.
मा.पृथ्वीराज सुतार–जर वर्गीकरणच उपलब्ध झाले नाही तर काम कसे होणार?
मा.राजेंद्र राऊत,कार्य.अभि.(भवन)–वर्गीकरण झाल्याशिवाय होणार नाही.
मा.अध्यक्ष–या विषयातील एकच काम होईल आणि ३० लाख रू.चे काम होणार नाही.
मा.पृथ्वीराज सुतार–त्यांना मंडई बांधण्यासाठी खूप निधी लागणार आहे.
मा.अध्यक्ष–दोन्ही कामे होणार नाहीत. हा विषय दफ्तरी दाखल करावा.
मा.पृथ्वीराज सुतार–दफ्तरी दाखल करणे हा नंतरचा विषय आहे परंतु यामध्ये खात्याची सुध्दा जबाबदारी होती की, हे काम करावयास हवे होते.
मा.राजेंद्र राऊत,कार्य.अभि.(भवन)–भवन रचना विभागाकडून डिझाईन्स तयार करणे, टेंडर्स मागविणे ही कामे करण्यात आली आहेत. टेंडर प्रक्रियेमध्ये वेळ गेला आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–खात्याकडील १० लाख रू.पर्यंत बजेट उपलब्ध करून द्यावे. जेणेकरून काम सुरू करता येईल.
मा.अध्यक्ष–हे दोन्ही प्रस्ताव पुढील सभेत घ्यावेत त्या दरम्यान मा.सभासद यांना कळवून हे प्रस्ताव मागे घ्यावेत.
मा.उपनगरसचिव–विषय क्र.४२४ बाबतचा निर्णय द्यावा.
मा.अध्यक्ष–विषय क्र.४२४ पुढील सभेत घ्यावा.
निर्णय–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.४२५
मा.रविंद्र धंगेकर–हा विषय मान्य करावा.
मा.पृथ्वीराज सुतार–हा विषय पुढील सभेत घ्यावा. आम्हाला या विषयाची माहिती घ्यायची आहे.
मा.अध्यक्ष–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
मा.हेमंत रासने–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
निर्णय–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.४२६
मा.ॲड.अभय छाजेड–हा विषय मान्य करावा.
मा.अध्यक्ष–हा विषय मान्य करावा.
निर्णय–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.४२७
मा.पृथ्वीराज सुतार–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
मा.अध्यक्ष–सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा.
मा.ॲड.अभय छाजेड– आपण मा.महा.आयुक्त साहेबांकडे चर्चा करू कारण ते मा.जिल्हाधिकारी असताना त्यांनीच हा प्रस्ताव मा.महा.आयुक्त यांच्याकडे पाठविला आहे.
मा.चेतन तुपे–मा.आयुक्त साहेब, तुम्ही एकूण १४ पैकी हडपसर येथीलच ४ जागा मागितल्या आहेत. त्यामुळे विरोध होत आहे. एकूण १४ जागा पैकी १० जागा रद्द करून फक्त शहराच्या एकाच भागातील म्हणजे हडपसर भागातील जागा मागितल्या आहेत.

त्यामुळे शहराच्या पूर्व भागातील नागरीकांवर अन्याय होत आहे. त्यामुळे हडपसर भागातील सर्व नगरसेवक असे म्हणत आहेत की, आपलीच मैदाने का द्यावीत? यामुळे हडपसरमधील नागरीकांवर अन्याय होत आहे.

मा.ॲड.अभय छाजेड–याबाबत तुम्ही सगळेजण एकत्र बसून निर्णय घ्यावा.

मा.चेतन तुपे–आम्ही तुमच्या बरोबर बसू परंतु आमची भूमिका तुम्हाला सांगत आहोत.

मा.ॲड.अभय छाजेड–याबाबत जो काही निर्णय असेल तो घेऊ

निर्णय–सदर विषयाचा विचार १५ दिवसानंतर करावा.

मा.सौ.नंदा लोणकर–आमच्या वानवडी भागामध्ये मनपाच्या जागेमध्ये इनामदार हॉस्पीटलचे बांधकाम झाले आहे. या जागेच्या मोबदल्यात त्यांना या इमारतीचे दोन मजले मनपाला देण्याचे कबूल केले होते आणि तरी सुध्दा आपण त्यांना भोगवटा पत्र कसे दिले? असे असताना सुध्दा या हॉस्पीटलकडून सर्वसामान्य गरीब नागरीकांना कोणतीही मदत मिळत नाही. या हॉस्पीटलमध्ये भरपूर बिल आकारले जाते.

मा.पृथ्वीराज सुतार–(आर–७) रिर्झेवेशनची प्रोसिजर काय आहे? याबाबत माहिती द्यावी.

मा.शंकर केमसे–सदरची माहिती देताना आपण सह्याद्री हॉस्पीटल्ससाठी ज्या जागा दिल्या आहेत आणि या मोबदल्यामध्ये त्यांच्याकडून मनपाला कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत? याची सुध्दा माहिती द्यावी.

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–मा.अध्यक्ष,मी (आर–७) बद्दल माहिती देतो. सन १९९७ साली डी.सी.रूल्स मध्ये रिर्झेवेशन ॲकोमेडेशन, (आर–७) ही तरतूद नव्याने करण्यात आली होती. सन १९९७ पूर्वी अशी तरतूद होती की,सगळी आरक्षणे महानगरपालिकेने ताब्यात घ्यावीत व विकसीत करावीत. परंतु महानगरपालिकेकडे तेवढा निधी उपलब्ध नसल्यामुळे सन १९९७ साली (आर–७) व टी.डी.आर.या संकल्पना आल्या. (आर–७) म्हणजे, आपल्याकडे जर (आर–७) अंतर्गत एखादा हॉस्पीटलचा प्रस्ताव दाखल झाला तर त्यांनी आपल्याला २५ टक्के बांधकाम मोफत द्यावे आणि या २५ टक्केच्या मोबदल्यात त्यांना ॲडशिनल कंपोनंट मिळतो आणि तो त्याप्रमाणे बांधकाम करू शकतो असे फायर बिग्रेड, ई.डब्ल्यु.एस.,सी.सी.यु.,कल्चरल सेंटर इ.अशी अनेक आरक्षणे आहेत.

मा.पृथ्वीराज सुतार–आपण जे रिर्झेवशन (आर–७) अंतर्गत करण्यात येते त्यामध्ये एकूणपैकी ५० टक्के जागा द्यायची का?

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–नाही, (आर–७) मध्ये नियम वेगळे आहेत. समजा ई.डब्ल्यु.एस असेल.

मा.पृथ्वीराज सुतार–या प्रकरणाबाबत माहिती द्यावी.

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–त्यांनी आपल्याला हॉस्पीटल्ससाठी २५ टक्के बांधकाम द्यावे लागते.

मा.पृथ्वीराज सुतार–समजा जर, १० हजार स्के.फूट जागा असेल तर त्यांनी आपल्याला २५०० स्के.फूट बांधीव जागा द्यावी.

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–होय.

मा.पृथ्वीराज सुतार–त्याऐवजी आपण त्यांना काय देतो?

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–त्यांनी २५ टक्के बांधीव जागा दिल्यानंतर आपण त्यांना २५ टक्के इतका ॲडीशनल एफ.एस.आय.देतो. मग तो त्यामध्ये बांधकाम करू शकतो.

मा.पृथ्वीराज सुतार–या प्रकरणामध्ये कोणती अडचण झाली?

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–आज वर्तमानपत्रामध्ये वानवडी सर्व्हे नं.१५ मधील हा विषय आहे. हे प्रकरण आपल्याकडे २००५ साली दाखल झाले होते.या प्लॉटचे क्षेत्रफळ १५५०.६४ चौ.मीटर आहे आणि या जागेवर डिस्पेन्सरी आणि मॅटेर्निटी होमचे आरक्षण होते. आपण त्यांना (आर–७) अंतर्गत परवानगी दिली. आरक्षण क्षेत्राच्या २५ टक्के म्हणजेच मनपाला २७६.२५ चौ.मी.बांधकाम हस्तांतरीत करणे अभिप्रेत होते. यामध्ये अप्पर फ्लोअर आणि पहिला मजला एवढे क्षेत्र मनपाला देणे अपेक्षित होते.

मा.पृथ्वीराज सुतार–बांधकाम नकाशा मंजूर करताना, आपल्याला जी जागा ताब्यात घ्यायची आहे ती जागा प्लॅन मध्ये दाखवितात का?

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–हे क्षेत्र मंजूर नकाशामध्ये दाखविले जाते.

मा.पृथ्वीराज सुतार–त्यानंतरच हा प्रस्ताव मंजूर होतो का?

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–हो.

मा.पृथ्वीराज सुतार–त्यावर उल्लेख होतो का? की हे क्षेत्र मनपासाठी राखीव आहे.

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–होय, आपण ही जागा मनपाला देणार आहोत असे प्लॅन मध्ये दाखविण्यात येते.

मा.हेमंत रासने–आपण ही जागा मनपाला देणार आहोत, हे फक्त आपण प्लॅनमध्ये दाखवितो. आता आपण ज्या इतर जागा ताब्यात घेतो, त्यावेळी त्या जागेवर महानगरपालिकेचे नाव लावून घेतो.

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–फक्त आरक्षणाची जागा ताब्यात घ्यायची असेल तर आरक्षणाची जागा ताब्यात घेतल्यानंतर मनपाचे नाव लावतो.

मा.पृथ्वीराज सुतार–तुम्ही हे क्षेत्र प्लॅनमध्ये दाखविता, हे बांधकाम ताब्यात घेणे हे कधी अपेक्षित असते?

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–याबाबत आपण संबंधीतांसह करारनामा केलेला असतो. शक्यतो हे बांधकाम कंम्पलिशन पूर्वीच ताब्यात घ्यावे.

मा.पृथ्वीराज सुतार–शक्यतो नाही, (आर–७) मध्येच अशी अट आहे की, ही जागा ताब्यात घेतल्याशिवाय त्यांना पूर्णत्वाचा दाखला देता येत नाही.

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–अगदी बरोबर आहे.

मा.पृथ्वीराज सुतार–या प्रकरणामध्ये काय झाले? व हे कोणी केले आहे? याबाबत माहिती द्यावी.

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– ही इमारत ७ मजल्यांची आहे. या ७ मजल्यापैकी पहिले दोन मजले मनपाला देणेबाबत निर्देशित केले आहे. संपूर्ण हॉस्पीटलचा ७ मजल्याचा प्लॅन मंजूर आहे.

मा.पृथ्वीराज सुतार–आपण हॉस्पीटलला किती पट बांधकाम देतो?

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–आपण हॉस्पीटलला १ एफ.एस.आय.देतो.

मा.पृथ्वीराज सुतार–१ पटीने पूर्ण झाला व आपले क्षेत्र यामध्ये पूर्ण झाले का?

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–१ पटीने झाला.

मा.पृथ्वीराज सुतार–आपण तेव्हा ताब्यात घेतले का?

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–ते अद्याप ताब्यात आलेले नाही.

मा.पृथ्वीराज सुतार–आपण हे बांधकाम तेव्हा ताब्यात का घेतले नाही? आणि त्यानंतर त्यांना मा.महा.आयुक्त यांच्या अधिकारात दीड एफ.एस.आय.मान्य केला आहे. त्यानंतर त्यांनी दोन एफ.एस.आय.साठी राज्यशासनाकडे प्रस्ताव पाठविला.

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–नाही, त्यामध्ये असे झाले आहे की, आपण पहिल्या चार मजल्यांसाठी पार्ट भोगवटा पत्र दिले आहे. उर्वरित तीन मजल्यांसाठी भोगवटा पत्र दिलेले नाही.

मा.हेमंत रासने–आपण पहिले दोन मजले ताब्यात घेण्याआधीच त्यांना भोगवटा पत्र कसे काय देण्यात आले?

मा.पृथ्वीराज सुतार–मा.आयुक्तसाहेब हा खूप गंभीर विषय आहे.

मा.रविंद्र धंगेकर–जागा ताब्यात घेतल्याशिवाय आपण पूर्णत्वाचा दाखला देत नाही या प्रकरणामध्ये हा दाखला कसा काय देण्यात आला?

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–पार्ट ऑक्युपन्सी अद्याप दिलेली नाही.

मा.रविंद्र धंगेकर–या हॉस्पीटलचे चार मजले बांधकाम पूर्ण झालेले असताना दोन मजले बांधकाम आपल्या ताब्यात का घेतले नाहीत.

मा.सौ.नंदा लोणकर–कंम्पलिशन सर्टिफिकेट नसताना उर्वरित बांधकाम कसे काय पूर्ण करण्यात आले?

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–मा.अध्यक्ष, प्रस्तुत प्रकरणी आपला ताबा झालेला नाही, ही वस्तुस्थिती आहे.

मा.रविंद्र धंगेकर–या बांधकामाला भोगवटा पत्र देताना ही जागा ताब्यात का घेतली नाही?

मा.पृथ्वीराज सुतार–ताबा दिलेला नसताना तुम्ही भोगवटा पत्र कसे काय दिले? याबाबत माहिती द्यावी.

मा.सौ.नंदा लोणकर–संपूर्ण हॉस्पीटल सुरू कसे काय झाले?

मा.पृथ्वीराज सुतार–मा.आयुक्त साहेब ४ मजल्याचे बांधकाम पूर्ण झाले होते त्यावेळी दोन मजले ताब्यात घेवून पार्ट कंम्पलिशन देणे अपेक्षित होते. आपल्याला जागेचा ताबा मिळालेला नसताना हे पार्ट कंम्पलिशन सर्टिफिकेट कोणी दिले? व कसे काय दिले?

मा.अनिल राणे–मा.अध्यक्ष, मागील शहर सुधारणा समितीमध्ये मा.सभासदानी या जागेचा ताबा दिला आहे का? असे विचारले होते आणि त्यावेळी सदर जागेचा आपल्याकडे ताबा आलेला आहे, असे ऑन रेकॉर्ड उत्तर दिले आहे.

मा.रविंद्र धंगेकर–मा.आयुक्त साहेब, ही किती गंभीर चूक आहे आणि आपण इथे चर्चा केली तरी यावर उत्तरे देणार नाहीत.

मा.पृथ्वीराज सुतार–असे कसे काय? आम्हाला खुलासा मिळाला पाहिजे.

मा.रविंद्र धंगेकर–मा.आयुक्त साहेब, आपण या प्रकरणामध्ये चौकशी करावी. यामध्ये जे संबंधीत अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई करावी. आपल्याला माहिती मिळणार नाही. त्यामुळे मा.अध्यक्ष, आपण यांना आदेश द्यावेत की, ज्यांनी गंभीर चुका केल्या आहेत, त्यांच्यावर कडक कारवाई करावी.

मा.पृथ्वीराज सुतार–माहिती द्यावी.

मा.अध्यक्ष–या प्रकरणाबाबत चर्चा होऊ द्यावी.

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–मा.अध्यक्ष, आपण त्यांना ४ मजल्यांचे कंम्पलिशन दिलेले आहे. वरील ३ मजल्याचे कंम्पलिशन.

मा.हेमंत रासने–४ मजल्याचे कंम्पलिशन कसे काय देण्यात आले? आपण त्यांच्यासह करारनामा केला होता.

मा.सौ.नंदा लोणकर–पहिल्यांदा दोन मजल्याचा ताबा घेऊन मग त्यांना कंम्पलिशन द्यावयास हवे होते.

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–मा.अध्यक्ष, त्यांनी १ वर्षापूर्वी शासनाकडे रिप्रेझेटेशन केलेले आहे. शासनाने या संदर्भात मा.डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंग यांना अभिप्राय विचारलेला आहे.

मा.रविंद्र धंगेकर–भोगवटा पत्र देताना सदरची जागा ताब्यात का घेतली नाही? याबद्दल माहिती द्यावी.

मा.सौ.कमल व्यवहारे–त्यांनी शासनाकडे कोणता पत्र व्यवहार केला आहे?

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–त्यांनी शासनाकडे असे रिप्रेझेटेशन केले आहे की, हे संपूर्ण हॉस्पीटल मी विकसीत करीत आहे. साधारणत: (आर–७) अंतर्गत तो आपल्याला इतर कंम्पोनंट देतो त्यावेळी त्यांच्या म्हणण्याप्रमाणे करीत असतो.

मा.हेमंत रासने–राज्यशासनाचा विषय नंतर आला.

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–बरोबर आहे.

मा.हेमंत रासने–यामध्ये राज्य शासनाच्या प्रेझेटेशनचा विषयच नाही. त्यांना ४ मजल्याचे कंम्पलिशन कोणी दिले?

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–हे कंम्पलिशन खात्यामार्फत दिले आहे.
मा.हेमंत रासने–यामध्ये संबंधीत अधिकारी कोण होते?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–ते पहावे लागेल.
मा.हेमंत रासने–आज दै.सकाळ सारख्या वर्तमानपत्रामध्ये बातमी आली आहे म्हणून याबाबत ताबडतोब पहाणी करावी.
मा.पृथ्वीराज सुतार–हे वृत्त सगळयाच वर्तमानपत्रामध्ये आहे. यामुळे आपली बदनामी होत आहे.
मा.हेमंत रासने–सदरची माहिती मागवून घ्यावी आणि त्यानंतर चर्चा करू.
मा.शंकर केमसे–मला एक विचारायचे आहे की, संबंधितांनी संपूर्ण प्रक्रिया सुरू होण्याआधी राज्य शासनाकडे अर्ज केला आहे का?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–याबाबत त्यांनी शासनाकडे दीड वर्षापूर्वी पत्रव्यवहार केला आहे.
मा.शंकर केमसे–आपल्याला शासनाने काही आदेश दिले आहेत का?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–आपल्याला शासनाने आदेश दिलेले नाहीत. हे संचालक,नगररचना यांच्याकडे अभिप्रायसाठी पाठविले आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–महापालिकेने जागा ताब्यात घेऊ नये असे आदेश दिले आहेत का?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–असे आदेश दिलेले नाहीत.
मा.पृथ्वीराज सुतार–यामध्ये दोन गोष्टी आहेत. आपण त्यांच्याकडून जागा ताब्यात न घेता, त्यांना कंम्पलिशन दिले ही आपली चूक आहे आणि हे कंम्पलिशन न घेता हे संपूर्ण हॉस्पीटल सुरू आहे. ही सुध्दा मोठी चूक आहे.
मा.हेमंत रासने–करार केलेला असताना सुध्दा त्यांना कंम्पलिशन दिले आहे. हे कोणत्या अधिकाऱ्यांनी केले आहे?
मा.पृथ्वीराज सुतार–आपण या मिळकतीची करआकारणी करणार आहात का? आपण गरीब जनतेला मात्र लगेचच आकारणी करतो.
मा.अध्यक्ष–या मिळकतीला सुध्दा करआकारणी सुरू करावी.
मा.महा.आयुक्त–या मिळकतीमधील सर्व ७ मजल्यांचा वापर सुरू झाला आहे का?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– संपूर्ण ७ मजल्यांचा वापर सुरू आहे.
मा.महा.आयुक्त–तुम्ही पहिल्या ४ मजल्याचे कंम्पलिशन दिले आहे आणि त्यावरील ३ मजल्याचे कंम्पलिशन दिलेले नाही.
मा.हेमंत रासने–४ मजल्याचे कंम्पलिशन कसे काय दिले? हा मुख्य मुद्दा आहे.
मा.महा.आयुक्त–यामध्ये दुसरा मुद्दा असा आहे की, ४ मजल्यांचे पार्ट कंम्पलिशन दिले आणि तेथे ७ मजल्यांचे बांधकाम झाले. उर्वरित ३ मजल्याचे कंम्पलिशन दिलेले नाही. या चार मजल्याचे पार्ट कंम्पलिशन देताना दोन मजल्यांची जागा आपल्या ताब्यात येणे अपेक्षित होते.
मा.पृथ्वीराज सुतार–साहेब, बरोबर आहे, त्यांनी आधीच जागा ताब्यात द्यावयास हवी होती. त्यानंतर त्यांना कंम्पलिशन द्यावयास हवे होते त्यामुळे हे बांधकाम अनधिकृत झाले आहे.
मा.महा.आयुक्त–अनधिकृत ऑक्युपन्सी राहील.
मा.पृथ्वीराज सुतार–पझेशन.
मा.हेमंत रासने–पुन्हा आपण त्यांना अधिकृत कंम्पलिशन दिले आहे. सामान्य नागरीकांना बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देताना खूप त्रास देतात आणि आता आपल्या ताब्यातील जागेला कंम्पलिशन देत आहेत? आमच्या भागातील ८० टक्के मिळकतींना एकेक एन.ओ.सी.नाही म्हणून कंम्पलिशन देण्यात आलेले नाही. आपण त्यांच्यावर तीन पट टॅक्स आकारतो.
मा.पृथ्वीराज सुतार–आपण एक लक्षात ठेवा की, आज असे एक प्रकरण उघडकीस आले आहे. परंतु प्रत्यक्षात अशा अनेक मिळकती आहेत की, ज्या (आर–७) अंतर्गत विकसीत केल्या आहेत व त्यांना कंम्पलिशन दिलेले नसतानाही त्या मिळकतींचा वापर सुरू आहे. मा.अध्यक्ष, आपण आदेश द्यावेत की, पुणे शहरामध्ये (आर–७) अंतर्गत ज्या काही डेव्हलपमेंट रिर्झेवेशन्स असतील त्याबाबतची संपूर्ण माहिती पुढील सभेत द्यावी.
मा.हेमंत रासने–आता ज्या विषयावर चर्चा सुरू आहे त्या प्रकरणाची कागदपत्रे मागवावीत.
मा.अध्यक्ष–सदरचे प्रकरण मागवून माहिती द्यावी.
मा.अनिल राणे–ज्यावेळी आपल्याला २५ टक्के बांधकाम मिळते आणि विकसकास दीड एफ.एस आय मिळतो त्यावेळी आपल्या २५ टक्के बांधकामामध्ये काही वाढ होते का? की सगळा वाढीव एफ.एस.आय.संबंधीत विकसकाला मिळतो? याबाबत माहिती द्यावी.
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– यामध्ये वरील ०.५ चे मिळत नाही. पहिल्यांदा जे १ ने मान्य झालेले असते त्याचेच मिळते.
मा.अध्यक्ष–मा.राणे साहेब आपल्याला योग्य वाटत नसेल तर प्रश्न पुन्हा विचारावा.
मा.हेमंत रासने–यामध्ये प्रश्न आणि उत्तरे दोन्ही बरोबर आहेत.
मा.चेतन तुपे–मा.अध्यक्ष, यामध्ये दोन्ही बरोबर आहे. (आर–७) अंतर्गत मनपाला १५ ते २० टक्के बांधकाम क्षेत्र मिळाले पाहिजे असे म्हंटले आहे. काही वाढीव एफ.एस.आय.मध्ये तसा नियम नाही. आपल्याला हे आता ठरवावे लागेल की, जर एफ.एस.आय.मुळे बांधकामाचे प्रमाण वाढले तर वाढीव एफ.एस.मध्ये सुध्दा वाढ घ्यावी का? याचा निर्णय घ्यावा लागेल. कारण (आर–७) मुळात असे आहे की, तुमची जी जागा आहे त्या मोबदल्यात एवढे बांधकाम क्षेत्र द्यायचे आहे. समजा उद्या एखाद्याने

जर २ एफ.एस.आय. मागितला तर, आपण दोन वर १५ प्लस १५ आपण घेणार आहोत का? हे आपल्याला ठरवावे लागेल हा धोरणात्मक विषय आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–आतापर्यंत हे करावयास हवे होते.
मा.चेतन तुपे–आता हा पहिल्यांदा विषय समोर आला. आता आपल्याला ठरवावे लागेल.
मा.पृथ्वीराज सुतार–आपण कसे देणार? मूळ जागेवरच द्यावे लागेल.
मा.अध्यक्ष–याबाबत श्री.पावस्कर यांनी अधिकृत उत्तर द्यावे.
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– मा.अध्यक्ष, आपण पहिल्यांदा जो १ एफ.एस.आय.मान्य करतो, त्यातील २५ टक्के कंपोनंट मनपाला मिळतो. त्यांना जो वाढीव ०.५ वरील २५ टक्के बांधकाम मनपाला देणे, हे नियमानुसार अभिप्रेत नाही.
मा.पृथ्वीराज सुतार–आपण यामध्ये बदल करू शकतो का?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– मा.अध्यक्ष, आता आपला डी.पी.प्रसिध्द झालेला आहे. त्यामुळे यामध्ये जर आपण तशी शिफारस केली तर ते समाविष्ट करू शकतो.
मा.शंकर केमसे–मग याप्रमाणे करण्यास कोणती हरकत आहे?
मा.अध्यक्ष–हे डी.पी.मध्ये करावे लागेल.
मा.पृथ्वीराज सुतार–मा.तुपेसाहेब हे तुमच्याच अधिकारात आहे. त्यामुळे याप्रमाणे मान्यता द्यावी.
मा.चेतन तुपे–आज इथे सर्व मा.पदाधिकारी आहेत आणि आज मा.पावस्कर साहेबांनी याबाबत सांगितले आहे. या संदर्भात प्रशासन आणि मा.आयुक्तसाहेब यांचेसह चर्चा करून ते ठरवावे लागेल की, धोरण कसे असावे? कारण (आर–७) हे बेसीक एफ.एस.आय.वर आहे. वाढीव एफ.एस.आय., समजा एखाद्या विकसकाने नंतर बांधकाम केले. जसे की, आता पहिल्यांदा एक एफ.एस.आय.चे केले, त्यानंतर दीड एफ.एस.आय.चे केले त्यानंतर दोन एफ.एस.आय.चे केले. तसेच यामध्ये दुसरी गडबड होण्याची शक्यता अशी आहे की, आपण फक्त तळमजला आणि पहिला मजलाच मागतो आणि जर आपण तळमजला आणि पहिला मजला घेतला आणि संबंधितांनी खूप उंच इमारत बांधली तर, आपल्याला त्यामध्ये सुध्दा अमेंडमेंट करावी लागेल. या सर्व बाबींच्या अनुषंगाने प्रशासनासह चर्चा करून धोरण करावयास हवे.
मा.अध्यक्ष–पुन्हा नंतर टी.डी.आर.लोड झाल्यानंतर सुध्दा हा विषय येतो.
मा.चेतन तुपे–मा.अध्यक्ष, टी.डी.आर.च्या बाबतीत करता येणार नाही. हे फक्त एफ.एस.आय.च्या बाबतीत करता येईल. फक्त शाळा आणि हॉस्पीटल्स यांनाच एफ.एस.आय. मिळतो.
मा.पृथ्वीराज सुतार–जर दोन एफ.एस.आय.मिळाला तर, तो टी.डी.आर.कसा लोड करू शकेल?
मा.चेतन तुपे–ही अमेंडमेंट शासनाने आणली आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–एफ.एस.आय. मिळाल्यानंतर तिथे टी.डी.आर.कसा लोड होईल?
मा.चेतन तुपे–जास्तीच्या एफ.एस.आय.च्या बाबतीत मा.महा.आयुक्त आणि मा.नगर अभियंता यांचेसह चर्चा करावी लागेल.
मा.पृथ्वीराज सुतार–आपण हॉस्पीटल्स आणि शाळांच्या बाबतीत तुमच्या अधिकारात ०.५ किंवा दीड एफ.एस.आय. करतो, आणि त्यानंतर राज्य शासनाच्या परवानगीने दोन एफ.एस.आय.देण्यात येतो. आपण तिथे टी.डी.आर.देतच नाही. आपण फक्त एफ.एस.आय.देत आहोत.
मा.महा.आयुक्त–मा.सभासदाचे म्हणणे असे आहे की, यावर पुन्हा ॲडशिनल टी.डी.आर.लोड होईल का?
मा.पृथ्वीराज सुतार–कसे काय होईल?
मा.महा.आयुक्त–आपण नॉर्मली, अशा प्रकरणात टी.डी.आर.लोड करीत नाही.
मा.पृथ्वीराज सुतार–ते तसे करताच येत नाही.
मा.सौ.नंदा लोणकर–संबंधितांनी ही मिळकत ४ वर्षे वापरली आहे. आपण त्यांना दंड आकारणी करणार आहोत का?
मा.सौ.कमल व्यवहारे– त्यांनी आपले दोन मजले ४ वर्षे बेकायदेशीर वापरले त्याबद्दल दंड आकारावा.
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– या इमारतीला ७ मजले सॅक्शन आहे.
मा.मुकारी अलगुडे–तुम्हाला ७ मजल्यांचे कळाले, परंतु खालील २ मजल्यांच्या बाबतीत कळाले नाही.
मा.सौ.कमल व्यवहारे–आपण संबंधितांकडून दोन मजल्याचे चार वर्षापासूनचे भाडे वसूल केले पाहिजे.
मा.हेमंत रासने–यामध्ये सर्वात महत्वाचे असे आहे की, आपण हे दोन मजले ताब्यात घेतलेच नाहीत.
मा.सौ.नंदा लोणकर– त्यांनी आपली मालमत्ता वापरली आहे.
मा.हेमंत रासने–ही आपल्या अधिकाऱ्यांची चूक आहे. आपल्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे.
मा.मुकारी अलगुडे–मा.अध्यक्ष,मा.पावस्कर यांनी या इमारतीला ७ मजल्याची परवानगी असल्याचे सांगितले आहे. या इमारतीमधील दोन मजले आपल्या ताब्यात न घेता या इमारतीला ७ मजल्याची परवानगी कशी काय देण्यात आली?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– मा.अध्यक्ष, सुरूवातीलाच हा प्लॅन सॅक्शन होताना हा प्लॅन ७ मजल्यांचा झाला होता.
मा.मुकारी अलगुडे–आपण दोन मजले ताब्यात घ्यावयास हवे होते की नाही?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– होय, आपण आपल्या ताब्यात घ्यावयास हवे होते.
मा.मुकारी अलगुडे–मग हे ताब्यात का घेतले नाही? आणि ७ मजल्यांची परवानगी दिली ही कोणती पध्दत आहे?
मा.सौ.कमल व्यवहारे–आपण या जागेवर आरक्षण टाकले आहे. ते या जागेचे मालक नाहीत.
मा.रविंद्र धंगेकर–हे एकूण क्षेत्रफळ किती होते?

मा.सौ.नंदा लोणकर–४९ हजार ६०० चौ.फूट इतकी जागा होती.
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– ही परवानगी १५५०.७ चौ.मी.जागेवर दिली आहे.
मा.रविंद्र धंगेकर–हे १५ हजार स्के.फूटाचे बांधकाम आहे का?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– होय.
मा.रविंद्र धंगेकर–मग या बांधकामातून आपल्याला किती जागा मिळणार आहे?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– मा.अध्यक्ष, त्यांच्याकडून २७६.२५ चौ.मी.इतकी जागा मिळणार आहे.
मा.रविंद्र धंगेकर–आपण कंम्पलिशन देताना १,२,३,४ मजल्यांचे केले की, मध्येच केले आहे.
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– आपण पहिल्या ४ मजल्याचे कंम्पलिशन दिले आहे.
मा.रविंद्र धंगेकर–आपण पहिल्या चार मजल्याचे कंम्पलिशन केले त्यामध्ये दोन मजले आपले होते. मग त्यावेळी आपण ताबा घेऊनच कंम्पलिशन द्यावयास हवे होते.
मा.पृथ्वीराज सुतार–यामध्ये दोन विषय गंभीर आहेत, ताबा न घेता कंम्पलिशन देण्यात आले आणि दुसरी गोष्ट बाकीची पूर्तता पाहताच वाढीव एफएसआय दिला आहे.
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– मा.अध्यक्ष, यामध्ये खुलासा करतो की, अंतिम कंम्पलिशन पूर्वी आपल्या ताब्यात आले पाहिजे याची आपण खातरजमा बाळगणे आवश्यक आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–तुम्ही चुकीचे सांगत आहात.
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– यामध्ये अंतिम कंम्पलिशन झालेले नाही.
मा.अध्यक्ष–मा.सुतार साहेब यांनी जे सांगितले आहेत त्यामध्ये वास्तव काय आहे ? ते नीट समजून घ्यावे. तुम्ही आता स्पष्ट उत्तर देत आहात की, अंतिम कंम्पलिशन दिलेले नाही. मग या मिळकतीचा वापर सुरू झाला आहे? याबद्दल आपण कोणती कारवाई केली?
मा.पृथ्वीराज सुतार–आपल्याकडे त्यांनी पहिला प्लॅन १ एफ.एस.आय.चा टाकला होता. हे बरोबर आहे का?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– मा.अध्यक्ष, हे बरोबर आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–त्यांचे कंम्पलिशन झाल्याशिवाय, तुम्ही वाढीव एफ.एस.आय.कसा काय दिला? याबद्दलची प्रोसिजर काय आहे? त्याची माहिती द्यावी.
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– मा.अध्यक्ष, पहिल्यांदा एक एफ.एस.आय. नियमानुसार मान्य होतो.
मा.पृथ्वीराज सुतार–मान्य होतो, त्यानंतर तुम्ही कंम्पलिशन घेता.
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– नाही, असे नाही. त्या आधी ०.५ एफ.एस.आय.ला मंजुरी देण्याचे अधिकार मा.महा.आयुक्त यांना आहेत.
मा.पृथ्वीराज सुतार–ठीक आहे, त्यांनी मंजुरी दिली, परंतु ही जागा ताब्यात घेणे, हे तुमचे काम होते.
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– अंतिम भोगवटा पत्रापूर्वी ताब्यात घेणे.
मा.पृथ्वीराज सुतार–अंतिम नाही.
मा.रविंद्र धंगेकर–अंतिम नाही, तुम्ही पहिल्या चार मजल्यांना पार्ट कंम्पलिशन दिल्यानंतर आपण जो कंपोनंट देतो तो आपल्या हिश्याचाच दिला आहे. तो कंपोनंट देताना ताबा घ्यावयास हवा होता व त्यानंतर भोगवटा पत्र द्यावयास हवे होते.
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– मा.अध्यक्ष, आपण दिले आहे. परंतु आपण जेव्हा (आर–७) ची मान्यता घेतो तेव्हा अंतिम भोगवटा पत्र, जागा ताब्यात आल्याशिवाय कुठल्याही परिस्थितीत देत नाही.
मा.सौ.नंदा लोणकर–माझ्या प्रभागामध्ये अनेक इमारतींना भोगवटा पत्रे देण्यात आलेली नाहीत. या इमारतींमध्ये नागरीक १५ वर्षापासून रहात आहेत. मी दररोज एका सोसायटीच्या नागरिकासह मनपा मध्ये येते. त्या नागरीकांना कंम्पलिशन सर्टिफिकेट देण्यात आलेले नाही. त्यांना पाणी पुरवठा करण्यात येत नाही. त्यांच्या मिळकतींना १५ वर्षापासून करआकारणी करण्यात आलेली नाही. शेवटी आम्ही इंन्डीपेन्डंट कंम्पलिशन घेऊन या मिळकतींना करआकारणी करणार आहोत. मी प्रत्येक बैठकीमध्ये हा विषय मांडत आहे. हा विषय मागील वर्षी सुध्दा मांडला होता, परंतु याची कोणीही दखल घेतली नाही. तुम्ही बांधकाम व्यावसांयिकांना स्टॉप ऑर्डर देऊन त्यांची दुसरी कामे बंद का करीत नाही? एन.आय.बी.एम. रोड येथील कलाश्रीच्या एकाही इमारतीला कंम्पलिशन नाही. त्यांना कर आकारणी लागू केली नाही. आता ते कॅम्पाकोला प्रकरण झाले त्यामुळे नागरीक जागरूक झाले आहेत आणि ते आमच्याकडे मदतीसाठी येत आहेत. या ठिकाणी अजून एक औरूहा बिल्डर आहेत.
मा.मुकारी अलगुडे–आपण इनामदार हॉस्पीटलला भोगवटा पत्र दिले आहे का?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– भोगवटा पत्र दिले आहे.
मा.मुकारी अलगुडे–मग आजच्या वर्तमानपत्रामध्ये मा.वाघमारे,नगरअभियंता यांनी असे स्टेटमेंट दिले आहे की, मी भोगवटा पत्र दिलेले नाही. हे स्टेटमेंट का दिले आहे? हे भोगवटा पत्र कोणी दिले?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– मा.अध्यक्ष, पार्ट भोगवटा पत्र दिले आहे. ते अद्याप पूर्ण झालेले नाही.
मा.मुकारी अलगुडे–याबाबत मा.वाघमारे, नगर अभियंता यांचे स्टेटमेंट आहे की, मी भोगवटा पत्र दिले नाही. मग हे भोगवटा पत्र कोणी दिले असेल? त्यांचे नाव इथे जाहीर करावे.
मा.हेमंत रासने–मा.अध्यक्ष, यामध्ये दोनच महत्वाचे विषय आहेत. आपण पाहिले दोन मजले ताब्यात घ्यावयास हवे होते. सदरचे प्रकरण मागविण्यात आले आहे का?

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– मा.अध्यक्ष, सदरचे प्रकरण मागवून घेतले आहे.
मा.अध्यक्ष–सदर प्रकरणामध्ये अटीशर्ती काय आहे? याची पाहणी करून माहिती द्यावी.
मा.सौ.कमल व्यवहारे–मा.अध्यक्ष, मला एक खुलासा हवा आहे की, ती जागा कोणाची आहे?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–ती जागा सोसायटीच्या मालकीची आहे.
मा.सौ.कमल व्यवहारे–कोणत्या सोसायटीची जागा आहे?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– ही जागा कोहिनूर सोसायटी आहे.
मा.सौ.कमल व्यवहारे–त्यावर आरक्षण आहे का? आणि ते कोणते रिर्झेवेशन आहे.
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–या जागेवर डिस्पेन्सरी आणि मॅटेर्निटी होमचे आरक्षण आहे.
मा.सौ.कमल व्यवहारे–आपण त्यांना परवानगी देताना कोणती अट घातली होती?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–सोसायटीला (आर–७) अंतर्गत परवानगी देताना, २५ टक्के जागा मनपाला द्यावी. अशी अट घातली होती.
मा.सौ.कमल व्यवहारे–या जागेवर हॉस्पीटलचे रिर्झेवेशन होते मग (आर–७) करायची गरज होती का?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–त्यावेळी या सोसायटीने आपल्याकडे (आर–७) अंतर्गतचा प्रस्ताव दिला होता.
मा.सौ.कमल व्यवहारे–परंतु (आर–७) करण्याची गरज होती का?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–प्रस्ताव आला आणि आपण तो मान्य केला.
मा.सौ.कमल व्यवहारे–याबाबत तुमच्या खात्याचे मत काय आहे?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–मा.अध्यक्ष, सन १९८७ सालचा डी.पी.चे इंम्पिलिमेंटेशन पुअर झाले आहे आणि अशा परिस्थिती आपण ती जागा ताब्यात घेऊन विकसीत करीत नसू तर आणि अन्य कोणी विकसक पुढे येऊन (आर–७) अंतर्गत बांधकाम करून काही जागा आपल्या ताब्यात देत असेल तर आणि तेथील नागरीकांना सोईसुविधा मिळत असतील तर (आर–७) करण्यास काहीही हरकत नाही.
मा.सौ.कमल व्यवहारे–त्यांनी (आर–७) अंतर्गत प्रस्ताव टाकल्यानंतर आणि तेथे जर तेच रिर्झेवेशन असल्यास, आणि तेच रिर्झेवेशन ते फालो करीत असल्यास त्यांनी आपल्याला जागा दिली पाहिजे, असे काही बंधनकारक आहे का? आपण जागा विकसीत करू शकत नाही. आपण ही जागा ताब्यामध्ये घेऊ शकत नाही, आणि त्यांनी हा प्रस्ताव टाकला होता. त्यांनी आपल्याला जागा देणे हे बंधकारक आहे का?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–मा.अध्यक्ष, सन १९९७ पूर्वी रिर्झेवेशन असलेली जागा त्याच वापरासाठी पूर्ण विकसीत करण्याचे अधिकार होते. सन १९९७ मध्ये जेव्हा (आर–७) ची तरतूद आली त्यावेळी (आर–७) मध्ये ते विकसीत करावे आणि २५ टक्के जागा मनपाला द्यावी, अशी तरतूद आली. त्यामुळे त्यांनी ही जागा आपल्याला देणे आवश्यक आहे.
मा.सौ.कमल व्यवहारे–त्यांनी हा प्लॅन कधी टाकला आहे?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– त्यांनी हा प्लॅन २००५ साली मंजुरीसाठी दिला होता.
मा.सौ.कमल व्यवहारे–त्यांनी शासनाकडे कोणती मागणी केली आहे?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– इतर जे (आर–७) असतात, त्या अंतर्गत प्रस्ताव मंजूर करताना जेवढा कंपोनंट मनपाला द्यावयाचा असतो. त्या वापरासाठी तो कंपोनंट दिल्यानंतर बाकीचे जे बांधकाम असते ते आम्ही आमच्या इच्छेनुसार करू शकतो म्हणजेच जर व्यापारी करावयाचे असेल तर व्यापारी करू शकतो निवासी करावयाचे असेल तर निवासी करू शकतो. मात्र प्राप्त परिस्थितीमध्ये आम्ही संपूर्ण हॉस्पीटलचे बांधकाम करीत आहोत आणि केलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये २५ टक्केची अट आम्हाला लागू होऊ नये आणि आम्ही पूर्ण हॉस्पीटलचे बांधकाम केले आहे. आम्ही ते चालवितो आम्हाला ते चालविण्यासाठी द्यावे.
मा.सौ.कमल व्यवहारे–हे नियमामध्ये बसू शकते का?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– मा.अध्यक्ष, त्यांनी याबाबत शासनाकडे परवानगी मागितली आहे आणि शासनाने डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंगचा अभिप्राय मागितला आहे.
मा.सौ.कमल व्यवहारे–टाऊन प्लॅनिंगचा अभिप्राय दिला आहे का?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–मा.अध्यक्ष, अद्याप टाऊन प्लॅनिंग विभागाने अभिप्राय दिलेला नाही.
मा.सौ.कमल व्यवहारे–आता हे जे प्रकरण समोर आले आहे, त्यामध्ये कोणाची चूक आहे? यामध्ये आपण कोणावर कारवाई करणार आहात?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–मा.अध्यक्ष, आपण या प्रकरणांमध्ये थेट शासनाकडे व डायरेक्ट यांच्याकडे पत्र व्यवहार करून.
मा.पृथ्वीराज सुतार–ते चुकीचे सांगत आहेत. पत्र व्यवहार करण्याचा काहीही संबंध नाही.
मा.अध्यक्ष–मा.पावस्कर साहेब, तुम्ही उत्तर देताना बऱ्याच गोष्टी व्हॉयबल केल्यासारखी उत्तरे देत आहात. पहिली गोष्ट अशी आहे की, (आर–७) अंतर्गत विकसनाची परवानगी कोणी मागितली होती?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– मा.अध्यक्ष, ही त्यांची मागणी होती.
मा.अध्यक्ष–आज आम्हाला हे बंधन असू नये, असे कोण म्हणत आहेत?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– ही, सुध्दा त्यांचीच मागणी आहे.

मा.अध्यक्ष–याचा अर्थ आपण त्यांना पार्ट कंम्पलिशन दिले म्हणून त्यांनी या सुविधेची मागणी केली आहे.
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– मा.अध्यक्ष, असे म्हणता येणार नाही.
मा.अध्यक्ष–मग कसे? आपण जर पार्ट कंम्पलिशन देताना आपली जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असती तर हे पुढे जाऊ शकले नसते की, आम्हाला यामध्ये सूट मिळावी.
मा.पृथ्वीराज सुतार–आपण त्यांना सहकार्य होईल, अशी परिस्थिती निर्माण केली आहे का?
मा.शंकर केमसे–कंम्पलिशन देण्याच्या आधी जागा ताब्यात घ्यावी, असे आहे का?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– अगदी बरोबर आहे.
मा.शंकर केमसे–कंम्पलिशन पूर्वी जागा ताब्यात घ्यायला हवी, असा डी.सी.रूल्समध्ये उल्लेख आहे का?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– डी.सी.रूल्समध्ये अंतिम कंम्पलिशन पूर्वी जागा ताब्यात घ्यायला हवी, असे सुध्दा नाही. शेवटी आपण आपले हित पाहण्यासाठी अंतिम कंम्पलिशनपूर्वी जागा ताब्यात घेतो.
मा.पृथ्वीराज सुतार–यामध्ये महापालिकेचे हित पाहिले का?
मा.शंकर केमसे–मला डी.सी.रूल्स मध्ये काय लिहले आहे? याची माहिती द्यावी.
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– मा.अध्यक्ष, डी.सी.रूल्स मध्ये असे लिहले आहे की, जर एखाद्याला (आर–७) अंतर्गत परवानगी देण्यात आली तर, ज्या आरक्षणाला दिलेली आहे. त्या आरक्षणाच्या नियमानुसार (आर–७) खाली जो कंम्पोनंट मनपाला देऊ लागतो. तो कंम्पोनंट मनपाने ताब्यात घ्यावा आणि विकसकाने त्याला मिळालेल्या परवानगीनुसार विकसन करावे.
मा.शंकर केमसे–पूर्ण कंम्पलिशन देण्याच्या आधी सदरची जागा ताब्यात घ्यावी, असे डी.सी.रूल्स मध्ये आहे का?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– डी.सी.रूल्स मध्ये असे नमूद नाही.
मा.महा.आयुक्त – तुम्ही गोंधळ करीत आहात, पार्ट कंम्पलिशन करताना आपल्याला त्यांनी ते क्षेत्र ताब्यात देणे अपेक्षित आहे की,अंतिम कंम्पलिशन देताना, ही जागा ताब्यात घेणे अपेक्षित आहे? तुम्ही मघाशी असे सांगितले की, अंतिम कंम्पलिशन देण्यापूर्वी आपला ताबा आला पाहिजे. आता मा.सभासद यांनी प्रश्न विचारल्यावर तुम्ही असे म्हणत आहात की, असे नाही. नियमात काय आहे?
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)– रूल्समध्ये असे स्पेसिफिक नाही परंतु आपण जेव्हा (आर–७) अंतर्गत परवानग्या देतो तेव्हा कुठल्याही परिस्थितीत आपला कंम्पोनंट आल्याशिवाय आपण त्यांना अंतिम भोगवटा पत्र देत नाही.
मा.पृथ्वीराज सुतार–आपण जे पार्ट कंम्पलिशन दिले आहे त्यावेळी आपली जागा ताब्यात आली आहे की नाही? चार मजल्यांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.
मा.शंकर केमसे–त्यांना अंतिम भोगवटा पत्र मिळाले आहे का?
मा.पृथ्वीराज सुतार–यामध्ये डी.सी.रूल्सचा संबंध काय आहे?
मा.शंकर केमसे–यामध्ये कायदेशीर काय आहे? ते महत्वाचे आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–आमचे म्हणणे असे आहे की, समजा हे जर ५ व्या, ६ व्या मजल्यावर असेल आणि आपण त्यांना पार्ट कंम्पलिशन दिले आणि पुढील कंम्पलिशन घ्यायचे आहे. हे आम्हाला मान्य आहे. परंतु यामध्ये पहिले जे दोन मजले होते ते आपल्याला द्यावयास हवे होते. त्या मजल्यांचे कंम्पलिशन झालेले आहे. याचा अर्थ ते पूर्ण झालेले आहे. आपण ती जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया राबविली पाहिजे. ही प्रक्रिया लांबविण्याचे कारण काय आहे. ५ वर्षे ही बाब आपल्या लक्षात येत नाही का?
मा.शंकर केमसे–मा.अध्यक्ष, याबाबत चौकशी करण्याचे आदेश द्यावेत, मग हा विषय संपेल.
मा.अध्यक्ष–यामध्ये फार मोठे, (आर–७) अंतर्गतच नव्हे तर या पार्ट कंम्पलिशनच्या नावाखाली आपण फार मोठा मिळकत कर बुडवित आहोत. फक्त (आर–७) नव्हे तर साधारण इमारतीसाठी सुध्दा असाच उद्योग चालू आहे. आपण यामध्ये मनमानी करीत आहोत. संपूर्ण इमारत वापरात असून सुध्दा पूर्णत्वाचा दाखला घेतला जात नाही आणि आकारणी न करता त्या मिळकती वापरल्या जातात. या मध्ये जबाबदार कोण आहेत?
मा.सौ.नंदा लोणकर–माझ्या प्रभागामध्ये अशा भरपूर इमारती आहेत.
मा.अध्यक्ष–फक्त (आर–७) नव्हे सर्व इमारतीमध्ये आपण पार्ट कंम्पलिशनच्या नावाखाली असे घोटाळे होत आहेत.
मा.सौ.नंदा लोणकर–आमच्या प्रभागामध्ये संबंधितांचीच एक बांधकाम साईट चालू आहे. ते तेथील राडारोडा शेजारील संरक्षक भिंतीवर टाकत आहेत.
मा.महा.आयुक्त–आपण परवाच्या उत्पन्नवाढीच्या बैठकीमध्ये हा मुद्दा ऑलरेडी घेतला आहे की, ज्या ठिकाणी पार्ट कंम्पलिशन घेतले मात्र अंतिम कंम्पलिशन न घेता ज्या इमारतीचा भोगवटा सुरू झाला असेल तर या मिळकतींचा सर्व्हे करावा, तपासणी करावी आणि जर यामध्ये वापर सुरू झाला असेल तर, तुम्हाला तडजोड शुल्क आकारता येईल, तुम्हाला दंडात्मक रक्कम आकारता येईल, तुम्हाला असेसमेंट मध्ये तीनपट रक्कम आकारता येईल. हा महसूल वाढीचा मुद्दा बैठकीमध्ये घेतला आहे. मा.अध्यक्ष यांनी सांगितलेली वस्तुस्थिती आहे. पार्ट कंम्पलिशन देण्यात येते आणि इमारतीचा वापर सुरू झालेला असतो. त्या इमारतीला पार्ट कंम्पलिशन दिल्यामुळे त्या इमारतीला करआकारणी लागू होत नाही. फक्त मिळकतकराच्या बाबतीतच नव्हे तर, त्या ठिकाणी नागरिकांना कंम्पलिशनसाठी ज्या ज्या एन.ओ.सी.ची पूर्तता करावी लागते. ते सर्व अर्धवट ठेवून ही मंडळी त्या बांधकामाचा संपूर्ण वापर सुरू करतात. नंतर हे नागरीक सोसायटीचे सभासद होतात आणि आपल्याकडे येतात.
मा.अनिल राणे– मा.अध्यक्ष, पुणे शहरामध्ये अशा काही इमारती आहेत की, इमारतीला पार्ट कंम्पलिशन सुध्दा नाही आणि इमारतीचा वापर सुरू झालेला आहे.

मा.महा.आयुक्त–ते अनधिकृतच आहे.

मा.अनिल राणे–ते लोक व्यवसाय करतात.आपण त्यांच्यावर कोणती कारवाई करणार?

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–मा.अध्यक्ष, आपण त्या प्रकरणामध्ये पार्ट कंम्पलिशन दिले आहे.

मा.मुकारी अलगुडे–आपण पार्ट कंम्पलिशन देताना एन.ओ.सी घेतली आहे का?

मा.अध्यक्ष– या प्रकरणाची योग्य ती चौकशी करून पुढील सभेमध्ये याबाबतचा अहवाल सादर करावा. यामध्ये जे जबाबदार असतील, ज्यांनी दुर्लक्ष केले आणि यामध्ये खरोखरच कोणाच्या सोईसाठी व जाणीवपूर्वक दुर्लक्ष झाले असेल तर ती माहिती सुध्दा आमच्यासमोर आली पाहिजे आणि यामुळे महानगरपालिकेचे जे उत्पन्न बुडाले आहे आणि महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. या प्रकरणी भविष्यात शासनाने संबंधीत विकसकाचे म्हणणे मान्य केले आणि आपले दोन मजले त्यामधून गायब झाले तर हे नुकसान गृहीत धरून संबंधीतांवर दोष निश्चित करावा आणि त्याप्रमाणे पुढील कारवाई करावी.

मा.अनिल राणे–मा.अध्यक्ष, पुणे शहरामध्ये अशा काही मिळकती आहेत. आता मा.आयुक्त साहेबांनी त्या मिळकती बेकायदेशीर असल्याचे सांगितले आहे. काही इमारतीचे प्लॅन सॅक्शन आहेत, परंतु या बांधकामांनी पार्ट कंम्पलिशन घेतले नाही आणि भोगवटा पत्र सुध्दा घेतले नाही. अशा प्रकारच्या सर्व मिळकतींची माहिती पुढील सभेमध्ये द्यावी.

मा.महा.आयुक्त–या सर्व मिळकतींची माहिती एक आठवड्यात उपलब्ध करून देणे शक्य होणार नाही.

मा.अध्यक्ष–सदरची माहिती किमान एक महिन्यामध्ये सादर करावी, यामुळे मनपाचे उत्पन्न वाढेल. यामुळे सर्व बेकायदेशीर इमारती समोर येतील.

मा.पृथ्वीराज सुतार–सर्व इमारतीची माहिती एक महिन्यानी द्यावी परंतु आरक्षणे डेव्हलपमेंट बाबतची माहिती पुढील आठवडयात द्यावी.

मा.शंकर केमसे–मा.अध्यक्ष, माझी एक विनंती आहे की, एका हॉस्पीटलचे कामकाज अतिशय चुकीच्या पध्दतीने कामकाज चालू आहे. ते गोरगरीबांना लुटत आहेत. त्यांना महानगरपालिकेशी संबंधीत असणाऱ्यांना ही सुविधा द्यावी लागते, अशा रूग्णांना दोन लाख रूपयांच्या ऐवजी चार लाख रूपयांचे बिल आकारले जाते. या हॉस्पीटलमध्ये रूग्णांना भरमसाठ औषधे प्रिस्काईब केली जातात. यामध्ये हात रूमालापासून कॉटन पर्यंतच्या सर्व वस्तू असतात. या पध्दतीने ते भरपूर औषधे मागवून घेतात आणि यामुळे तो रूग्ण दगावतोच. हे हॉस्पीटल या पध्दतीने कामकाज करीत आहे आणि मनपाने या हॉस्पीटलसाठी जागा दिल्या आहेत. या हॉस्पीटलचे नाव सह्याद्री असे आहे. या हॉस्पीटल्सच्या सर्व जागा पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या आहेत. त्यांनी आपल्या बरोबर करार केला आहे की, मनपाकडून जे रूग्ण येतील त्यांना आम्ही सुविधा देऊ, त्यांना आम्ही मदत करू. डॉक्टरांनी पत्र दिल्यावर ते मदत करतात परंतु हे डॉक्टरांच्या लक्षात येणे शक्य नाही किंवा त्यांचे ते काम सुध्दा नाही. महानगरपालिकेकडून येणाऱ्या रूग्णांचे ते अगोदरच बिल दुप्पट तिप्पट करीत आहेत आणि कागदोपत्री मात्र सगळे व्यवस्थित ठेवतात. ते खूप लुटारू आहेत. गोरगरीबांना सर्वात जास्त कोण लुटत असतील? तर ते सह्याद्री हॉस्पीटल आहे. माझी कळकळीची विनंती आहे की, सह्याद्री हॉस्पीटल्सच्या सर्व कामकाजाची तपासणी मा.आयुक्त स्तरावरील अधिकाऱ्यांकडून करून घ्यावी आणि मा.आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली श्री.गिरोला सारखे चांगले, निर्भिड अधिकारी नेमून सर्व व्यवहारांची चौकशी करावी. मा.आयुक्त साहेब माझे मत असे आहे की, या प्रकरणामध्ये लक्ष देउन कारवाई करण्याची गरज आहे. हा माझा वैयक्तिक प्रश्न नाही, हा सर्व सामान्यांच्या लुटीचा प्रश्न आहे. हे हॉस्पीटल पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून चालू आहे म्हणून तेथे सर्वसामान्य माणूस विश्वासाने जातो. परंतु तुम्ही जर या हॉस्पीटलची चौकशी केली किंवा माहिती घेतली तर, आपल्या असे लक्षात येईल की, येथे मोठया प्रमाणामध्ये लूट होत आहे आणि आपण याचा हिशोबच करू शकत नाही. याबाबत आपण काय करणार आहात? याबाबतचा खुलासा द्यावा.

मा.महा.आयुक्त–चौकशी म्हणजे काय? आपण शहरी गरीब योजनेबाबत सांगत आहात का? ते हॉस्पीटल आपले नाही.

मा.शंकर केमसे–त्या हॉस्पीटल्सच्या जागा आपल्या आहेत आणि त्यांनी आपल्या बरोबर करार केलेले आहेत.

मा.ॲड.अभय छाजेड– आपण बऱ्याचशा हॉस्पीटल्सला जागा दिल्या आहेत.

मा.शंकर केमसे–त्यांनी आपल्या रूग्णांना सुविधा देऊ असे करार केले आहेत.

मा.महा.आयुक्त–या विषयाबाबत माहिती द्यावी.

मा.डॉ.परदेशी, आरोग्यप्रमुख–मा.अध्यक्ष, कर्वे रोड येथील सह्याद्री हॉस्पीटलची जागा पुणे महानगरपालिकेच्या मालकीची आहे. त्यांनी रेटेबल व्हॅल्यु भरून ३० वर्षासाठी ताब्यात घेतली आहे. जनरल वॉर्डचे ५ बेड, मोफत उपलब्ध करून देऊ, असा करार केला आहे.

मा.शंकर केमसे–आतापर्यंत किती रूग्णांनी ही सुविधा घेतली आहे?

मा.डॉ.परदेशी, आरोग्यप्रमुख–या अनुषंगाने सन ११–१२ मध्ये ३८ रूग्णांनी ही सुविधा घेतली आहे. सन १२–१३ मध्ये १५ रूग्णांनी आणि सन २०१३–१४ मध्ये ११ रूग्णांनी व सध्या दोनच रूग्णांनी ही सुविधा घेतली आहे.

मा.चेतन तुपे–चार वर्षामध्ये या सुविधेचा आलेख खाली खाली सरकत येत आहे. आपल्यासाठी ५ बेड आहेत आणि ३८ रूग्णांनी सुविधा घेत असताना हे बेड किती दिवस ऑक्युपाय होते? ते ३६५ दिवस ऑक्युपाय होते का?

मा.डॉ.परदेशी, आरोग्यप्रमुख–हे बेड कायम फ्री असले पाहिजेत.

मा.चेतन तुपे–मागील वर्षी फक्त ११ बेड असल्याचे सांगितले आहे. चालू वर्षात दोनच रूग्ण आहेत आणखी समजा,सहा महिन्यांमध्ये आणखी रूग्ण येतील. हे ११ रूग्ण किती दिवसांसाठी हॉस्पीटलमध्ये दाखल होते? हे बेड सरासरी किती दिवस वापरले गेले?

मा.डॉ.परदेशी, आरोग्यप्रमुख–यामध्ये दिवस असे नाही, परंतु ५ बेड हे कायम मनपासाठी ठेवण्यात येतात.
मा.चेतन तुपे–फक्त ११ रूग्णांनीच हे बेड ३५६ दिवस वापरले का?
मा.डॉ.परदेशी, आरोग्यप्रमुख–तशी माहिती उपलब्ध नाही.
मा.चेतन तुपे–मी स्पेसिफिक माहिती विचारत आहे की, या खाटांची ऑक्युपन्सी किती आहे? कारण आपण बिल मात्र ऑक्युपन्सीनुसारच देतो. ज्यावेळी हॉस्पीटलचे बिल येते त्यावेळी ऑपरेशन थिएटरचा चार्ज वेगळा, सर्जिकल्सचा चार्ज वेगळा आणि त्या बेडचे चार्जेस वेगळे लावलेले असतात. आपल्याला यावर ३६५ गुणीले ५ एवढी ऑक्युपन्सी हवी आहे. आपली ऑक्युपन्सी किती आहे? आणि त्याची टक्केवारी याबाबत माहिती द्यावी.
मा.डॉ.परदेशी, आरोग्यप्रमुख– सर, आपल्याला जी ५ बेडची सुविधा दिली आहे त्यामध्ये फक्त ११ रूग्णांना सुविधा दिली आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–या कार्यपध्दतीबाबतची माहिती द्यावी.
मा.डॉ.परदेशी, आरोग्यप्रमुख–हे रूग्ण आधी आमच्या विभागाकडे येतात आणि त्यांना जर जनरल बेड हवे असतील तर ते आम्ही उपलब्ध करून देतो.
मा.पृथ्वीराज सुतार–यासाठी कोणाची शिफारस आवश्यक असते?
मा.डॉ.परदेशी,आरोग्यप्रमुख–याबाबत मा.आरोग्यप्रमुख शिफारस करतात.
मा.पृथ्वीराज सुतार–तुम्ही आतापर्यत अशी शिफारस केली आहे का?
मा.डॉ.परदेशी, आरोग्यप्रमुख–मी आता त्याप्रमाणे माहिती दिली आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–ते लोक कोणाकडून आले होते?
मा.डॉ.परदेशी, आरोग्यप्रमुख–ती माहिती माझ्याकडे आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–या फ्री बेड योजनेमध्ये हॉस्पीटल रूग्णांवर कोणते उपचार करतात?
मा.डॉ.परदेशी, आरोग्यप्रमुख– जनरल वॉर्ड मधील सर्व उपचार केले जातात.
मा.पृथ्वीराज सुतार–ते आय.सी.यु.चे उपचार करणार की, ऑपरेशनचे उपचार करणार? याबाबत माहिती द्यावी.
मा.डॉ.परदेशी, आरोग्यप्रमुख–ज्या रूग्णांना आय.सी.यु. ऑपरेशनची आवश्यकता नाही, असे सर्व उपचार त्या बेडवर दिले जातात.
मा.पृथ्वीराज सुतार–यामध्ये शहरी गरीब योजनेचे रूग्ण असतात का?
मा.डॉ.परदेशी, आरोग्यप्रमुख–ती योजना वेगळी आहे. फ्री बेड योजनेमध्ये ते रूग्ण नाहीत.
मा.शंकर केमसे–शहरी गरीब योजनेमध्ये तर लूटच आहे.
मा.डॉ.परदेशी,आरोग्यप्रमुख–फ्री बेड मध्ये पूर्ण मोफत आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–शहरी गरीबचे रूग्ण या योजनेतंर्गतच दाखल करून घेतात आणि ५ बेड फ्री ठेवणे ही सुविधा आपल्याला देत नाहीत. थोडक्यात म्हणजे ते आपल्याला फसवितात. यावर आरोग्य विभागाचे कोणतेही नियंत्रण नाही.
मा.शंकर केमसे–आपण जर पी एम.पी.एम.एल.च्या बसमध्ये गेलो तर महिलांसाठी राखीव असलेली खुर्ची रिकामी असते. अपंगासाठी राखीव असेल तर ती खुर्ची रिकामी ठेवली जाते. याप्रमाणे सह्याद्री हॉस्पीटल मध्ये मनपाच्या फ्री बेडच्या पुढे, हे बेड मनपासाठी राखीव आहे असे लिहले आहे का?
मा.डॉ.परदेशी,आरोग्यप्रमुख–तेथे असे लिहले नाही. तिथे पाटी लावलेली आहे.
मा.शंकर केमसे–आपण तेथे आताच व्हिजीट करू आम्हाला ते दाखवावे.
मा.पृथ्वीराज सुतार–आज ते ५ बेड राखीव आहेत का?
मा.डॉ.परदेशी, आरोग्यप्रमुख– ते ५ बेड राखीव असे नाहीत परंतु ते ५ बेडची सुविधा देऊ शकतात.
मा.मुकारी आलगुडे–जर बेड राखीव नसेल तर, त्यांना जागा कशी मिळणार?
मा.पृथ्वीराज सुतार–तुम्ही चुकीची माहिती देत आहात का? आपल्या रूग्णांसाठी ५ बेड कायम राखीव असले पाहिजेत. आता आपण तेथे व्हिजीट करू आम्हाला आपले ५ फ्री बेड रिकामे बेड दाखवावेत.
मा.अनिल राणे–आपण कधीही गेलो तरी तेथे बेड मिळत नाहीत, आणि तेथे कोणीही सांगत नाहीत की, हे बेड मनपासाठी राखीव आहेत.
मा.शंकर केमसे–मा.आयुक्तसाहेब व मा.अध्यक्ष, माझी आपणास हात जोडून विनंती आहे की, याबाबत मा.आयुक्त स्तरावरील अधिकारी नेमून या हॉस्पीटलची चौकशी करावी आणि ३० दिवसांमध्ये अहवाल द्यावा.
मा.हेमंत रासने–या विषयाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने कोणकोणत्या हॉस्पीटल्सला सवलती दिल्या आहेत? आणि याबाबत मनपा कोणकोणते करार केले आहेत? जसे सह्याद्री हॉस्पीटल्ससह ५ बेडचा करार झाला आहे, अशी अनेक हॉस्पीटल्स आहेत. यामध्ये रूबी हॉल हॉस्पीटल सुध्दा आहे. आपण या रूग्णालयांना वेगवेगळया सवलती दिल्या आहेत आणि त्या मोबदल्यात ते आपल्यासाठी काही बेड मोफत उपलब्ध करून देणार आहेत. त्या सर्व हॉस्पीटल्सची माहिती द्यावी.
मा.चेतन तुपे– मी शहर सुधारणा समितीचा अध्यक्ष असताना, हा विषय आमच्या समोर आला होता. याबाबत मा.आरोग्यप्रमुख यांना माहिती आहे. मा.अध्यक्ष, आम्ही त्यामध्ये असे सुचविले होते की, जर ही रूग्णालये मोफत बेडची सुविधा आणि उपचार देणार नसतील तर त्यांच्याकडून त्या प्रमाणातील रक्कम महानगरपालिकेकडे जमा करून घ्यावेत आणि महानगरपालिकेने बिल द्यावे. या पध्दतीने आम्ही मान्य करून पाठविले होते. मा.मुख्यसभेमध्ये अनेक डॉक्टर्स, अनेक सभासदांना भेटले आणि सगळयाच हॉस्पीटलला १० टक्के रूग्णांवर उपचार करावेत, असे सरकारचे बंधन आहे. कारण त्यांनी सरकारकडून ग्रेड घेतली

आहे. आम्ही त्यावेळी सगळया हॉस्पीटल्सची माहिती मागविली होती. त्यावेळी खात्याने अशी माहिती दिली होती की, पुण्यातील कोणतेही हॉस्पीटल हा नियम पाळत नाही. कोणतेही हॉस्पीटल गरीबांवर उपचार करीत नाही, त्यांनी शासनाकडून जास्तीचा एफ.एस.आय.घेतला आहे. त्यांनी महानगरपालिकेकडून सगळ्या सुविधा घेतलेल्या आहेत. सगळया मशनरीज इंम्पोर्ट केलेल्या आहेत. त्याच्या सर्व सवलती घेतल्या आहेत. परंतु एकही हॉस्पीटल गरीबांना त्याचे फायदे पुरवित नाही, हे प्रशासनाने आपल्या निदर्शनांस आणून दिले होते, म्हणून आम्ही असे सांगितले होते की, जर हे सुविधा देत नसतील तर, उदा.आता सह्याद्री हॉस्पीटलचा विषय चालू आहे. आपण एम्समध्ये सुध्दा असा करार करावा की, जर ५ बेडसाठी त्यांनी आपल्यासाठी उपचार द्यावयाचे आहेत तर प्रत्येक बेडची ३६५ दिवसांची किंमत काय आहे? म्हणून मी मघाशी असा प्रश्न विचारला होता की, या बेडची ऑक्युपन्सी किती आहे? आम्हाला जर ३६५ दिवसांची ऑक्युपन्सी मिळाली नाही. ती फक्त ५० दिवसांचीच मिळाली तर उर्वरित दिवसांचे १०० रू, १५०० रू, किंवा २०० रूपये प्रमाणे त्यांनी महानगरपालिकेला पैसे जमा केले पाहिजेत. ते पैसे शहरी गरीब योजनेच्या खात्यामध्ये जमा होतील आणि ते तिथे दिले जातील आणि त्यामार्फत आपण या रूग्णांवर उपचार करू शकू. सर्व पुणे शहरासाठी ही पॉलिसी आणली होती. परंतु मा.मुख्यसभेमध्ये आपणच सगळेजण होतो. कधी कधी कोणता विषय मांडला आहे हे लक्षात येत नाही, आपली प्रमुख ४ माणसे बोलतात आणि त्यानंतर आपल्याला त्यातील गांभीर्य कळत नाही म्हणून आपण तो विषय फेटाळला. माझी विनंती आहे की, ठीक आहे जनरल मध्ये लावू नका परंतु महानगरपालिकेची जी हॉस्पीटल्स आहेत आणि आपण त्याचे जे करार करीत आहोत. त्यावेळी आयदर ऑर म्हणजेच एकतर बेडस उपलब्ध करून द्यावेत किंवा त्या बेडसचे पैसे द्यावेत. या पध्दतीनेच करार व्हावा, म्हणजे त्यांच्यावर बंधन राहील आपली कॉट नसेल, तर ठीक आहे आम्ही त्या बेडसाठी निधी देतो कारण तो निधी तुम्हीच आम्हाला देणार आहात.

मा.शंकर केमसे– या कराराच्या व्यतिरिक्त ते एफ.एस.आय.वाढवून घेतात. आपल्या बरोबर करार करतात परंतु प्रत्यक्षात कोणतीच सुविधा मिळत नाही. मा.आयुक्त साहेब, मा.अध्यक्ष, माझी मागणी आहे की, आपण यावर कोणती उपाययोजना करणार आहात? याबद्दल माहिती द्यावी.

मा.हेमंत रासने–मा.अध्यक्ष, आपण याच अनुषंगाने आपण वेगळ्या पध्दतीने ज्या हॉस्पीटल्सला सवलती दिल्या आहेत आणि पुणे शहरातील एकाही हॉस्पीटलने पार्किंगचे नॉर्म्स पाळलेले नाहीत. त्यांनी त्यांच्या पार्किंगच्या जागेमध्ये ओ.पी.डी.थाटली आहे. याबाबत मी मागे सुध्दा लेखी प्रश्न विचारला होता. जी हॉस्पीटल्स आपल्याला सहकार्य करीत नाहीत, त्या सगळ्यांवर आपण कारवाई केली पाहिजे. जर आपल्याला त्यांचा उपयोगच होणार नसेल तर आपण त्यांना सवलती का द्याव्यात? आता मा.केमसे यांनी सांगितल्याप्रमाणे, छोट्या छोटया ऑपरेशन्ससाठी ४ ते ५ लाख रूपयांचे बिल देण्यात येते आणि आपल्या सारख्या सर्व लोकप्रतिनिधींना या विषयांना सामोरे जावे लागते. आपण त्यांचा कितीही पाठपुरावा केला तरी ते बिलाची रक्कम कमी करीत नाहीत.

मा.चेतन तुपे– आपण शहरी गरीब योजनेतंर्गत हे दर निश्चित करण्याबाबत प्रशासनाला सांगितले आहे.

मा.हेमंत रासने–परंतु या विषयाची अंमलबजावणी होत नाही.

मा.शंकर केमसे–मा.आयुक्तसाहेब, डॉक्टरांबाबत एका पुस्तकामध्ये असे लिहले आहे की, पूर्वी नरभक्षक राक्षस असत, आणि आताच्या काळामध्ये डॉक्टर नरभक्षक झाले आहेत. ते माणसांना खात आहेत. ते लोकांना लुटत आहेत.

मा.अध्यक्ष–आज डॉक्टर्स डे आहे.

मा.सौ.नंदा लोणकर–हे खरे आहे.

मा.चेतन तुपे– मग ही चर्चा योग्य दिवशी चालू आहे.

मा.हेमंत रासने–हॉस्पीटलच्या प्रकरणाची फाईल आणली आहे. संबंधितांना कंम्पलिशन कोणी दिले? याबाबतची माहिती द्यावी.

मा.शंकर केमसे–मा.अध्यक्ष, आपण या प्रकरणाबाबत आदेश द्यावेत.

मा.अध्यक्ष–मा.सभासदांनी या विषयासंदर्भातील अनेक त्रुटी आपल्या समोर मांडल्या आहेत.प्रशासनाने या प्रकरणाची सर्व शहानिशा करून तसेच रूग्णालयाचे जे बेडस करारनाम्यामध्ये नमूद केले आहेत आणि ते त्या प्रमाणे सामान्य नागरीकांना लाभ देत नसतील तर,त्याप्रमाणे त्या बेडचे वार्षिक बिल हॉस्पीटलकडून वसूल करावे. तसेच मा.हेमंत रासने यांनी आता काही हॉस्पीटल्स पार्किंगच्या नॉर्मची अंमलबजावणी करीत नाहीत, आणि हॉस्पीटल्सच्या या जागांचा दुरूपयोग केला जात आहे, या सर्व बाबीची तपासणी करून ही सर्व माहिती एक महिन्याच्या आतमध्ये मा.स्थायी समितीकडे सादर करावी.

मा.अनिल राणे–सह्याद्री हॉस्पीटलचे पार्किंग नाल्यावरील जागेमध्ये आहे. येथे नाल्यावर स्लॅब टाकून हे पार्किंग केले आहे. सदरचे काम कोणत्या विभागाकडून करण्यात आले आहे? याबाबत मी मा.महा.आयुक्त यांच्या कार्यालयाकडे दोन वेळा पत्रव्यवहार केला आहे. परंतु या पत्राचे कोणीही उत्तर देत नाहीत. सदर ठिकाणी सध्या पेड पार्किंग चालू आहे.

मा.पृथ्वीराज सुतार–या हॉस्पीटलच्या पार्किंगसाठी जागा उपलब्ध होत नव्हती त्यामुळे आपल्याच नाल्यावर स्लॅब टाकून पार्किंग उभारले व या इमारतीस परवानगी देण्यात आली.ही सुध्दा गंभीर बाब आहे.

मा.अध्यक्ष–जर नैसर्गिक नाल्यावर स्लॅब टाकून पार्किंग उभारले असेल तर हे सुध्दा बेकायदेशीर आहे. कारण नाल्याच्याबाबतचे सर्व अधिकार मा.जिल्हाधिकारी यांना आहेत.

मा.अनिल राणे–हा नाला हॉस्पीटलच्या साईड मार्जिन मध्येच येतो.

मा.महा.आयुक्त – हे सर्व त्या चौकशीमध्ये येईल.

मा.हेमंत रासने–(आर–७) चे प्रकरण आणले आहे या प्रकरणामध्ये कोणी कंम्पलिशन दिले त्यांचे नाव सांगावे.

मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–मा.अध्यक्ष, सदर प्रकरणाची संपूर्ण चौकशी करून माहिती देतो.

मा.हेमंत रासने–हे प्रकरण अतिशय गंभीर आहे याची माहिती आताच मिळाली पाहिजे.
मा.पावस्कर,कार्य.अभि.(डी.पी.)–मा.अध्यक्ष, या प्रकरणातील संबंधीत अधिकाऱ्यांची स्वाक्षरी ओळखू येत नाही.
मा.अध्यक्ष–सदरची माहिती पुढील सभेत द्यावी.
मा.पृथ्वीराज सुतार–मा.अध्यक्ष,आपण आता हॉस्पीटल्सबाबतची माहिती मागविली आहे. त्यामध्ये आपण फ्री बेडची वसूली करण्यात यावी असे सांगितले आहे. प्रत्येक हॉस्पीटल जेव्हापासून स्थापन झाले तेव्हा पासूनच ही थकबाकी वसूल करावी, असे आदेश द्यावेत आणि ती सुध्दा माहिती द्यावी, असे आदेश द्यावेत.
मा.अध्यक्ष– ते सर्व विषय हॉस्पीटल्सच्या परवानगीमध्ये येतील.
मा.योगेश मुळीक–(आर–७) च्या मिळकतीमध्ये चार मजल्याचे बांधकाम झाले आहे परंतु त्यावर चार मजल्याचे बांधकाम सुरू झाले आहे? याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.
मा.हेमंत रासने–त्यांना ७ मजल्यांची परवानगी दिली आहे.
मा.पृथ्वीराज सुतार–आपण ही जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू करणार आहोत की नाही?
मा.अध्यक्ष–इनामदार हॉस्पीटलच्या प्रकरणी ज्या दोन मजल्यांची जागा आपल्या ताब्यात येणे अपेक्षित आहे. ती जागा तातडीने कंम्पलिशन पूर्वी जागा ताब्यात घेणे आवश्यक आहे.
मा.महा.आयुक्त–इनामदार हॉस्पीटलच्याबाबत सन्माननीय अध्यक्ष व सदस्यांनी जे काही मुद्दे उपस्थित केले आहेत. या प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश देतो. यामध्ये ७ मजल्यांच्या बांधकामास कशा पध्दतीने परवानगी दिली? पार्ट कंम्पलिशन, आपले दोन मजले ताब्यात घेणे, वाढीव एफ.एस.आय.इ.बाबीची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करून सदरची माहिती स्थायी समितीला सादर करू.
मा.अनिल राणे–पुणे शहरामध्ये असे आणखी किती इनामदार आहेत? याचा सुध्दा शोध घ्यावा.
मा.पृथ्वीराज सुतार–जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया?
मा.महा.आयुक्त–ते सर्व एकत्रच होईल.
मा.राहुल तुपेरे–पर्वती जलकेंद्रामध्ये जी चोरी होते आणि त्याबद्दल चर्चा करण्यात आली होती. त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली? याची माहिती द्यावी.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–मा.अध्यक्ष, मागील सभेमध्ये ठरल्याप्रमाणे, सिंहगड रोड येथे दुसरी ॲमेनिटी स्पेस बघितली आहे. त्या जागेवर हे सर्व साहित्य शिफ्ट करण्यात येणार आहे. त्यासाठी फेन्सींगचे काम सुरू करण्यात येणार आहे आणि जिथे हे मटेरिअल आहे तिथे मोठया प्रमाणात सुरक्षा वाढविली आहे आणि तिथे सुरक्षा वाढविली असल्यामुळे तिथे आता चोऱ्या होत नाहीत.
मा.अध्यक्ष–पुढील सभेच्या आतमध्ये मटेरिअल शिफ्टींगचे काम होईल का?
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–मटेरिअल शिफ्टींगचे काम १५ दिवसांत पूर्ण होईल.
मा.अध्यक्ष–याबाबतची नोंद घ्यावी.
मा.राहुल तुपेरे–आता मा.कुलकर्णी साहेबांनी, सदर जागेवर मोठया प्रमाणात सुरक्षा वाढविली आहे आणि त्यामुळे चोऱ्या होत नाहीत, असे सांगितले आहे. परंतु शुक्रवारी त्या ठिकाणी चोऱ्या होत असतानाचे शुटींग माझ्याकडे उपलब्ध आहे.
मा.महा.आयुक्त–मा.अध्यक्ष, या विषयावर वारंवार चर्चा झालेली आहे. शेवटी त्या ठिकाणी सिक्युरिटी वाढविली आहे. सिक्युरिटी वाढविली याचा अर्थ असा नाही की, त्या ठिकाणी अजिबात चोऱ्या होणार नाहीत, शेवटी ती आपली सिक्युरिटी आहे. मा.सदस्यांनी कळविल्यानंतर मी स्वत: सुरक्षा अधिकाऱ्यांना सांगितले व तेथे सुरक्षा व्यवस्था वाढविली आहे. त्या ठिकाणी बंदुकधारी रखवालदार ठेवावेत असे सुध्दा म्हंटले आहे आणि आता ते मटेरिअल शिफ्ट होणार आहे. या विषयामध्ये स्वत: अति.महा.आयुक्त यांनी लक्ष घालून त्यांनी ठिकाणी एक पथक तपासणीसाठी पाठविले होते.
मा.राहुल तुपेरे–हे मटेरिअल किती दिवसात शिफ्ट होईल.
मा.अध्यक्ष–सदरचे शिफ्टींग १५ दिवसांत होईल, असे सांगितले आहे.
मा.राहुल तुपेरे–ठीक आहे.
मा.रविंद्र धंगेकर–पाणी पुरवठयाच्या टेंडर बाबतची माहिती द्यावी.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–मा.अध्यक्ष, वारजे जलशुध्दीकरण केंद्रावरील ऑपरेशन मेटेनेन्ससाठी आऊटसोर्स केले आहे. जुन्या ठेकेदाराची मुदत दि.३१ डिसेंबर रोजी संपणार असल्यामुळे आपण ऑक्टोंबर महिन्यामध्ये टेंडर प्रोसेस सुरू केली होती व जाहिरात देऊन टेंडर मागविले होते. ठरविलेल्या मुदतीमध्ये एकच टेंडर दाखल झाले म्हणून आपण एक्सटेन्शन दिले.
मा.रविंद्र धंगेकर–आपण ही जाहिरात कधी दिली आहे? ती तारीख सांगावी.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–आता तारीख उपलब्ध नाही परंतु ही जाहिरात नोव्हेंबर महिन्यामध्ये दिली होती.
मा.रविंद्र धंगेकर–ही तारीख किती होती?
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–आता सध्या तारखेची माहिती उपलब्ध नाही.
मा.रविंद्र धंगेकर–मी ती तारीख सांगतो. आपण दि.२१/११/२०१३ रोजी ही जाहिरात दिली होती. या पुढील माहिती द्यावी.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–त्यानंतर ठरलेल्या मुदतीमध्ये एकच टेंडर आल्यामुळे आपण मुदतवाढ दिली आणि त्यानंतर दुसरे टेंडर आले. पहिले टेंडर समर्थ इलेट्रीक आणि दुसरे एक्सटेन्शन मुदतीमध्ये वाटेक बॅक कंपनीचे टेंडर दाखल झाले.

मा.रविंद्र धंगेकर–आपल्याकडे दोन टेंडर आले. मुदतवाढ दिल्यानंतर दुसरे टेंडर आले.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–पहिल्यांदा एकच टेंडर आले होते नंतर मुदतवाढ दिल्यानंतर दुसरे टेंडर आले. दुसरे टेंडर आल्यानंतर त्यांची स्क्रुटनी केली व शिफारस करून ऑडीटमार्फत दक्षता विभागाकडे पाठविण्यात आले.
मा.रविंद्र धंगेकर–आता आपण इथे थांबू या, आपण दोन्ही टेंडर ओपन केले.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–होय,आपण दोन्ही टेंडर ओपन केले.
मा.रविंद्र धंगेकर–आता पुढील माहिती द्यावी.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–हे टेंडर ओपन केल्यानंतर दक्षता विभागामार्फत एक क्युरी काढण्यात आली होती.
मा.रविंद्र धंगेकर–तुम्ही दोन टेंडर का ओपन केले?
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–जाहिरातीमध्ये.
मा.रविंद्र धंगेकर–ते नाही, तुम्ही दोन टेंडर का ओपन केले? तुम्ही अ पाकिट ओपन केले.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–अ पाकिट ओपन केले.
मा.रविंद्र धंगेकर–ते का केले?
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–हे अ पाकिट ओपन केल्यानंतर ब पाकिट.
मा.रविंद्र धंगेकर–दोघांची कागदपत्रे योग्य आहेत, असा त्याचा अर्थ होतो.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–हो.
मा.रविंद्र धंगेकर–त्या शिवाय आपण अ पाकिट काढत नाही, म्हणजे दोघांचे पेपर व्यवस्थित होते असे तुमचे मत आहे.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–हो.
मा.रविंद्र धंगेकर–दोघांचे पेपर्स क्लेअर होते त्यामुळे तुम्ही ते टेंडर उघडले होते.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता(पा.पु.)– टेंडर कंन्डीशन्सप्रमाणे जे काही रजिस्ट्रेशन आहे ते पी.एम.सी.आणि पी.सी.एम.सी.
मा.रविंद्र धंगेकर–तुम्ही अ पाकिट कधी उघडता? तुम्ही पेपर पाहूनच अ पाकिट उघडता.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–अ पाकिट दाखल झाल्यानंतर आपण ते उघडतो.
मा.रविंद्र धंगेकर–म्हणजेच अ पाकिटामध्ये त्याचे पेपर्स क्लेअर होते.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)– यामध्ये जी तफावत झाली, त्याबाबतची माहिती देतो. जाहिरातीच्या निविदेमध्ये रजिस्ट्रेशनच्या बाबत पी.सी.एम.सी., पी.डब्ल्यु.डी.वैगेरे लिहले होते पण त्यामध्ये पी.एम.सी.असे लिहले नव्हते.
मा.रविंद्र धंगेकर–आपण अ पाकिट का उघडतो, असा प्रश्न विचारला आहे.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–ज्यांचे टेंडर दाखल होतात त्या सर्वांचे अ पाकिट उघडतो.
मा.रविंद्र धंगेकर–नाही. आपण सगळी पाकिटे उघडत नाही. तुम्ही खोटी माहिती देत आहात.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–आपण अ पाकिट उघडतो.
मा.अध्यक्ष–सगळयांचीच अ पाकिटे उघडली जातात.
मा.रविंद्र धंगेकर–ठीक आहे, पुढील माहिती द्यावी.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–त्यामध्ये स्क्रुटनी केल्यानंतर योग्य वाटल्यामुळे मग ब पाकिट उघडले.
मा.रविंद्र धंगेकर–दोन्ही ठेकेदारांचे ब पाकिटे उघडली यामुळे दोघांची कागदपत्रे योग्य आहेत,असा विषय झाला.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–हो. त्यामध्ये आम्ही जेव्हा ऑडिटच्यामार्फत दक्षताकडे पाठविले तेव्हा त्यांनी एकच क्युरी काढली की, जाहिरातीमध्ये पी.एम.सी.चे रजिस्ट्रेशन आवश्यक असे लिहले आहे आणि ठेकेदाराकडे पी.सी.एम.सी.चे रजिस्ट्रेशन आहे. यामध्ये ठेकेदाराने सुध्दा हे रजिस्ट्रेशन अपलोड केले होते त्याचे रजिस्ट्रेशन सन २०१३ मध्ये संपले होते.
मा.रविंद्र धंगेकर–तुम्ही दक्षताकडील माहिती देऊ नका. तुम्ही ज्यावेळी ब पाकिट उघडले त्यावेळी त्यांची कागदपत्रे क्लेअर होती. दक्षताकडील कार्यवाही ही पुढील माहिती आहे. परंतु तुम्ही जेव्हा त्यांचे ब पाकिट उघडले तेव्हाच तुम्ही त्यांना काम दिले. तुम्ही त्यांना वर्क ऑर्डर दिली होती का?
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–हो.
मा.रविंद्र धंगेकर–मग आपण त्यांच्याकडील काम का काढून घेतले?
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–सदरचे ठेकेदारांकडून लोअेस्ट रेट आल्यामुळे.
मा.रविंद्र धंगेकर–आपण त्याचे काम का काढून घेतले याबाबतचे उत्तर द्यावे. आपण कायदेशीर काम करतो की बेकायदेशीर काम करतो? याबाबत माहिती द्यावी.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–आपण कायदेशीरच काम करतो.
मा.रविंद्र धंगेकर–आपण त्यांना कायदेशीर वर्क ऑर्डर दिली होती.
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–आपण त्यांना वर्क ऑर्डर दिलेली नाही. सर्वात लोऐस्ट ठेकेदार असल्यामुळे काम सुरू करणेसाठी लेटर ऑफ इंटरेस्ट दिले होते.
मा.रविंद्र धंगेकर–तुम्ही हे पत्र कोणाच्या सहीने दिले?
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–हे पत्र मी माझ्या सहीने दिले आहे.
मा.रविंद्र धंगेकर–हे पत्र कायदेशीररित्या दिले होते की, बेकायदेशीररित्या दिले होते?
मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–लोऐस्ट आल्यामुळे आम्ही त्यांना काम सुरू करण्यास सांगितले होते.

मा.रविंद्र धंगेकर–तुमचे हे उत्तर योग्य नाही, तुम्हाला जसे योग्य वाटेल तसे उत्तर देत आहात.

मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–आमच्या पत्राला त्यांनी उलट उत्तर असे दिले की, आम्हाला वर्कऑर्डर दिल्याशिवाय आम्ही काम सुरू करणार नाही.

मा.रविंद्र धंगेकर–तुम्ही त्यांना पत्र दिले होते, ते पत्र का दिले होते?

मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–लोअेस्ट आल्यामुळे त्यांना काम चालू करण्यासाठी पत्र दिले होते.

मा.रविंद्र धंगेकर–आपण हे पत्र जबाबदारीने दिले होते तर मग पुन्हा त्याचे काम का काढून घेतले?

मा.हेमंत रासने–मा.आयुक्त साहेब असे पत्र देता येते का?

मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–हे ऑपरेशन मेंटेनेन्सचे काम आहे.

मा.हेमंत रासने–त्यांनी ज्या पध्दतीचे लेटर दिले आहे ते कायदेशीर पध्दतीने देता येते का?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–मा.अध्यक्ष, आपल्याकडे महानगरपालिकेच्या माध्यमातून टेंडर प्रक्रिया राबवित असताना जोपर्यंत टेंडर प्रक्रिया मान्य होत नाही तो पर्यंत त्या व्यक्तीला किंवा त्या संस्थेला काम देऊ नये. हा गर्व्हमेंटच्या कायद्यानुसार नियम आहे. पण आपण कुठल्या कामाकरिता आहोत? विशेषत: जर एखाद्या कामामध्ये कंटीन्युशन लागते आणि त्यामुळे ते काम बंद पडेल आणि त्याची पूर्वीची मर्यादा संपलेली असेल आणि नवीन वर्कऑर्डर देण्यामध्ये जर गॅप असेल तर, त्या मधल्या कालावधीमध्ये पूर्वीचे असलेले टेंडर आहे त्या रेटने करावे किंवा आपल्याकडे जसे की आता यांनी केले आहे की, जो लोऐस्ट आलेला आहे आणि ज्याला मिळेल त्या व्यक्तीला काम दिले परंतु जोपर्यंत मान्यता प्राप्त अधिकारी किंवा स्टॅंडिंग कमिटी यांची मान्यता होत नाही त्या व्यक्तीला तोपर्यंत जुन्या दरानेच काम करावे लागेल. महानगरपालिकेच्या इतर विभागामध्ये अशा प्रकारचे कामकाज होते. उदा. झाडणहद्दीचे काम किंवा इतर काही ऑपरेशन मेंटेनेन्सची कामे असतील किंवा वॉटर ट्रीटमेंट प्लॅन्ट असेल, आपण एक दिवसही त्याचे कामकाज बंद ठेवू शकत नाही, अशाप्रकारे खात्याच्या स्तरावर खातेप्रमुख निर्णय घेतात की, ज्यामुळे महानगरपालिकेला कोणतेही आर्थिक नुकसान होणार नाही.

मा.हेमंत रासने–ही कायदेशीर तरतूद आहे का?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–जर नवीन व्यक्तीला नवीन दराने द्यायचे असेल तर त्यासाठी मान्यता आवश्यक राहील परंतु जर जुन्या दराने काम करावयाचे असेल तर, त्यावेळेस ती मान्यतेने, किंवा समितीच्या नजरेस आणून दिले पाहिजे की, हे ॲग्रीमेंट या तारखेला संपले आहे आणि नवीन टेंडर मान्य होईपर्यंत आम्ही मागील व्यक्तीकडून जुन्या दराने काम करून घेत आहोत.

मा.शंकर केमसे–हा विषय मेंटेनेन्सचा आहे. आपण मेंटेनेन्स एक दिवस सुध्दा थांबवू शकत नाही.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–यामध्ये इतरही काही कामे आहे.

मा.शंकर केमसे–आता आपल्याला पर्वती जलशुध्दीकरण केंद्राचे मेंटेनेन्सचे काम करण्यासाठी ठेकेदार हवे आहेत परंतु टेंडरला जर वेळ लागत असेल आणि त्यामुळे कंटीन्यू केले असेल तर यामध्ये काही चूक आहे का?

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–मी तेच सांगत आहे की, नाही. परंतु जर आर्थिक नुकसान होत असेल, किंवा वेगळा दर दिला गेला असेल, आणि आर्थिक नुकसान होत असेल तर ती चूक आहे. दैनंदिन ऑपरेशन मेंटेनेन्स चालविण्याकरिता खात्याने जर काही निर्णय घेतला असेल तर.

मा.शंकर केमसे–मी तेच म्हणत आहे की, हे काम जुन्या रेटने कंटीन्यु करणे यामध्ये काही गैर आहे का?

मा.रविंद्र धंगेकर–तुम्ही त्यांना काम दिले आणि त्यानंतर त्यांनी एक महिनाभर काम केले आहे. हे बरोबर आहे का?

मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–बरोबर आहे.

मा.रविंद्र धंगेकर–मग त्यानंतर हे काम कोणी केले?

मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–जेव्हा दक्षता विभागाने आक्षेप काढले.

मा.रविंद्र धंगेकर–नंतर कोणी काम केले? याची माहिती द्यावी.

मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–आम्ही जेव्हा पत्र दिले त्यावेळी ठेकेदाराने आम्हाला पत्र दिले की, मला जो वर्क ऑर्डर दिली जात नाही, तो पर्यंत मी काम करणार नाही.

मा.रविंद्र धंगेकर–ते पत्र दाखवावे.

मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–मी सदरचे पत्र मागवून घेतो.

मा.अध्यक्ष–तुम्ही जो संदर्भ देत आहात, ते पत्र जवळ असावयास हवे.

मा.पृथ्वीराज सुतार–आता मा.अधिकारी दक्षताचा विषय सांगत आहेत. मग आपण सोईनुसार निर्णय घेतो का?

मा.अध्यक्ष–तो पर्यंत याबाबतचा पुढील प्रश्न विचारावा.

मा.रविंद्र धंगेकर–हा प्रश्न पुढील सभेत पुन्हा विचारू, त्यावेळी संपूर्ण माहिती देण्यात यावी.

मा.पृथ्वीराज सुतार–अधिकाऱ्यांनी पूर्ण तयारीसह यावे, माहिती मागविण्यामध्येच खूप वेळ जातो.

मा.महा.आयुक्त –मा.अध्यक्ष, मी सर्व अधिकाऱ्यांना सूचना देतो की, स्थायी समितीच्या मागील सभेत मा.सदस्य यांच्याकडून खात्याने माहिती द्यावी अशी सूचना दिली जाते. त्यावेळी त्या प्रकरणाची फाईल आणि कागदपत्रे बरोबर आणली पाहिजेत. जर आयत्या वेळेला विचारलेला विषय असेल तर मी समजू शकतो की, ती माहिती असणे अपेक्षित नाही. ज्यावेळी आपण ती माहिती देतो त्यावेळी त्या माहितीचा अभ्यास करून यावे. कारण तुम्ही जी माहिती दिली आहे ती ऑलरेडी त्यांनी विचारली आहे. जर

आयत्या वेळची माहिती असेल तर ठीक आहे परंतु मागील सभेमध्ये माहिती मागविली असेल आणि मी फाईल मागवितो असे उत्तर अपेक्षित नाही. आपण ती फाईल आणि माहिती येताना बरोबर आणली पाहिजे.

मा.पृथ्वीराज सुतार–विठ्ठलवाडी आणि मुंढवा येथे एस.टी.पी.चे दोन प्लॅन्ट आहेत. येथील ऑपरेशन्स आणि मेंटेनेन्स या कामाची मुदत संपली आहे का?

मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–मुदत संपण्यापूर्वी आपण टेंडर मागविले आहे.

मा.पृथ्वीराज सुतार–मी असे विचारले आहे की, मुदत संपली आहे का?

मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–ही मुदत संपली आहे.

मा.पृथ्वीराज सुतार–ही मुदत कधी संपली.

मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–मुंढवा येथील प्लॅन्टची मुदत ३० तारखेला संपली आहे.

मा.पृथ्वीराज सुतार–याचे स्टेटस काय आहे?

मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–मूळ ज्यांनी बांधले आहे. त्यांनी हे चालविण्याचे ५ वर्षाचे टेंडर स्कोप मध्ये होते. जो पर्यंत नवीन ठेकेदार येत नाहीत तोपर्यंत त्यांनी चालविण्याची जबाबदारी होती.

मा.पृथ्वीराज सुतार–करारानाम्यामध्ये असे आहे का?

मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–ॲग्रीमेंट नसले तरी त्यांना सांगून चालू ठेवले आहे आणि आपण त्यांना पैसे देणार नाही

मा.पृथ्वीराज सुतार–तुम्ही पैसे देणार नाही, म्हणजे तुम्ही दादागिरी करीत आहात का? तुम्ही त्यांना पैसे देणार नाही म्हणजे कसे काय? तुम्हाला कायद्यानुसार द्यावेच लागतील.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–ते त्यांनी बांधले आणि ५ वर्षे चालविले आहे. जोपर्यंत नवीन ठेकेदार येणार नाहीत तो पर्यंत त्याने चालू ठेवून त्यांना मोबदला दिला पाहिजे.

मा.पृथ्वीराज सुतार–जे आधीचे आहेत त्यांचा विषय संपला पाहिजे. हे टेंडर का चालू आहे ? तुम्ही टेंडर मागविले का?

मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–टेंडर मागविले आहे आणि एक्सटेंशनमुळे हे पुढे गेले आहे. आता आपण एक्सटेन्शन झाल्यानंतर त्याचे रितसर डॉक्युमेंटस पाठविले आहेत. आता ते मा.स्थायी समितीकडे मान्यतेसाठी येईल.

मा.पृथ्वीराज सुतार–समजा, संबंधितांना ते काम करायचे नसेल आणि ते जर सोडून जात असतील तर अशावेळी आपण काय करणार?

मा.महा.आयुक्त–मग ते आपल्याला ऑपरेट करावे लागेल.

मा.पृथ्वीराज सुतार–या गोष्टींकडे सुध्दा पाहिले पाहिजे. या बाबींकडे कोणीच पहात नाही आणि याप्रमाणे कोणीच काम करीत नाहीत. करारानुसार त्यांची मुदत संपली आहे. कायद्याप्रमाणे आपण त्यांना अडवू शकत नाही.

मा.महा.आयुक्त–ही मुदत कधी संपली होती.?

मा.पृथ्वीराज सुतार–ते आता टेंडर काढले आहे, असे सांगत आहेत. टेंडरचे सर्व फायनल झाले आहे का?

मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–या प्रकरणाचे सर्व कामकाज करून प्रकरण दक्षता विभागाकडे पाठविले आहे. हा विषय पुढील स्थायी समितीमध्ये मान्यतेसाठी येणार आहे.

मा.पृथ्वीराज सुतार–या दरम्यानचे आठ दिवसांसाठी पूर्वीचे ठेकेदार हे काम सुरू ठेवणार आहे का?

मा.कुलकर्णी,अधीक्षक अभियंता (पा.पु.)–हो, या कालावधीत ते काम करणार आहेत.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–हे काम सुरू ठेवण्यासाठी मुदतवाढ दिली आहे.

मा.पृथ्वीराज सुतार–त्यांची मुदत ३० तारखेला संपली आहे.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–या ८ दिवसांचे कामकाज सुरू ठेवण्यासाठी मुदतवाढ दिली आहे आणि याबाबत मा.स्थायी समिती निर्णय घेईल.

मा.पृथ्वीराज सुतार–आम्ही चौकशी केली तेव्हा ते ३० तारखेला काम सोडून गेल्याचे कळाले. यामध्ये त्यांची चूक नाही.

मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)–सर्व कामकाज योग्य पध्दतीने दुसऱ्याच्या ताब्यात देणे हे त्यांना क्रमप्राप्त आहे.

मा.पृथ्वीराज सुतार–जर त्यांना नियम असतील तर आपल्या अधिकाऱ्यांना नियम नाहीत का?

मा.महा.आयुक्त–त्यांना आठ दिवस काम सुरू ठेवण्याबाबत कळवावे. आपल्याला अनेक वेळा असे करावे लागते.

विषय क्र.४२८

मा.पृथ्वीराज सुतार–हा विषय पुढील सभेत घ्यावा.

मा.महा.आयुक्त–हायकोर्टाच्या आदेशाप्रमाणे आपल्याला या विषयाचा निर्णय घ्यावयाचा आहे.

मा.अध्यक्ष–त्यांची ३ महिन्यांची मुदत संपली आहे का?

मा.डॉ.परदेशी, आरोग्यप्रमुख–दि.६ जून रोजी ही मुदत संपली आहे.

मा.अध्यक्ष–त्यांची मुदत संपली आहे आणि हे आपल्याला चालवायचे आहे आणि हा निर्णय शासनाकडे पाठवायचा आहे.

मा.शंकर केमसे–जर हायकोर्टाने तसे आदेश दिले असतील आपल्याला हा निर्णय आज घ्यावा लागेल.

मा.अध्यक्ष–ठीक आहे, हा विषय मान्य करावा.

मा.पृथ्वीराज सुतार–मा.आयुक्त साहेब, आपण जरी या विषयाला आज मान्यता दिली तरी हा विषय मा.मुख्यसभेकडेच जाणार आहे.

मा.डॉ.परदेशी, आरोग्यप्रमुख–हो.

मा.पृथ्वीराज सुतार–आमची अशी विनंती आहे की, हा विषय पुढील आठवड्यात मान्य करावा.
मा.अध्यक्ष–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
निर्णय–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.

अशा पध्दतीने सभेचे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

Sd/-
**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**